cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–९५ | शुक्रवार दि.२६ जुलै २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

**संपादकीय**

## तरुणाईच्या भवितव्याशी धोकादायक खेळ

सर्वोच्च न्यायालयाने नीट–यूजी परीक्षा रद्द करण्यास नकार दिला आहे. परीक्षेचे पेपर नियोजनबद्ध पद्धतीने लीक झाले होते हे सांगणारे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने म्हटले आहे. त्यामुळे परीक्षेच्या पावित्र्यावर कोणतेही प्रश्नचिन्ह उपस्थित होत नाही म्हणून न्यायालयाने पुन्हा परीक्षा घेण्याचा आदेश देण्यास नकार दिला. परंतु या प्रकरणाची चौकशी सुरू राहील.

## नांदेडचे विष्णुपुरी ८५ टक्के भरले, बंधाऱ्याचे दरवाजे उघडण्याची शक्यता

नांदेड : नांदेडचा विष्णुपुरी प्रकल्प आता ८५ टक्क्यांनी भरला असून या बंधाऱ्याचे दार कधीही उघडले जाऊ शकते. त्यामुळे नदीपात्रात विसर्ग वाढण्याची शक्यता असून प्रकल्पाच्या पुढील गावांनी सतर्क रहावे, असा इशारा जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिला आहे. राज्यात सध्या जोरदार पाऊस पडत असून रात्रभर झालेल्या पावसाने राज्यातील धरणांमधील पाणीसाठा वाढला आहे. बंधाऱ्यात येणाऱ्या पाण्याची आवक लक्षात घेता विष्णुपुरी बंधाऱ्याचा दरवाजा कोणत्याही क्षणी उघडण्यात येईल, अशी सूचना पूर नियंत्रण अधिकारी यांनी केली आहे.


# नाशिक, संभाजीनगर, सोलापूरात कांदा महाबँक!

## मुख्यमंत्री शिंदे यांचे निर्देश,अणुऊर्जेच्या वापराने कांद्याची नासाडी रोखणार

**मुंबई । प्रतिनिधी**

**कांद्याची नासाडी रोखतानाच त्याच्या साठवणुकीसाठी महाराष्ट्रात अणुऊर्जा आधारीत कांदा महाबँक प्रकल्प सुरू होत असून, राज्यात नाशिक, छत्रपती संभाजी नगर आणि सोलापूर येथे तातडीने कांद्याची बँक सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरूवारी येथे दिले.**

कांदा महाबँक प्रकल्पाचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे बैठक झाली. यावेळी पणनमंत्री अब्दुल सत्तार, क्रीडा मंत्री संजय बनसोडे, राज्य कृषी मुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार मनोज सौनिक, मित्रा चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे, विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते. परमाणु आयोगाचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर दुरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते. मुख्यमंत्री शिंदे पुढे बोलताना म्हणाले की, कांदा हे नाशवंत पीक आहे. अणुऊर्जेच्या माध्यमातून त्यावर विकिरण प्रक्रीया करून



कांद्याची साठवणुक करता येईल. या कांदा बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठा फायदा होणार आहे. कांद्याची महाबँक ही संकल्पना प्रत्यक्षात येत असून त्याची सुरूवात अहमदनगर जिल्ह्यातील राहुरी येथून होत आहे. याठिकाणी हिंदुस्थान अग्रो संस्थेच्या माध्यमातून कांद्याची बँक सुरू होत आहे, असेही यावेळी सांगितले. पुढे बोलताना मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, कांद्याचे उत्पादन ज्या भागात जास्त प्रमाणात होते अशा नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर येथे विकरण प्रक्रीया केंद्र उभारून कांद्याची महाबँक तातडीने सुरू करण्याचे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी याबैठकीत दिले. यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, पणन, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या जागांचा वापर करण्यात यावा, असेही निर्देशही यावेळी दिले. याशिवाय मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, समृद्धी महामार्गालगत सुमारे १० ठिकाणी कांद्याची बँक करण्याचे प्रस्तावित असून त्याच्या कामाला गती देण्याचे निर्देश देत शेतकऱ्यांच्या हिताचा हा प्रकल्प असून कांद्याच्या महाबँकेमुळे कांद्याची साठवणुक करणे शक्य होईल. कांद्याला चांगला भाव मिळाल्यावर तो शेतकऱ्यांना विक्री करता येईल. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, असेही सांगितले. शेतकरी केंद्रबिंदु ठेवून हा प्रकल्प राबविण्यात यावा, ◀◀ पान २ वर

# जरांगे पाटील हे बारामतीच्या स्क्रिप्टवर चालतात

## जिल्ह्यातील पाचही मतदारसंघात ओबीसीचेच आमदार करा– प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांचे आवाहन

### माजलगावात ओबीसींची अभुतपूर्व मोटारसायल रॅली व संवाद यात्रा

**माजलगाव। प्रतिनिधी**

**मनोज जरांगे पाटील यांना कुठलाही अभ्यास नाही ते बारामतीच्या स्क्रिप्टप्रमाणे चालतात. ते काय बोलतात, त्यांची भाषा सुध्दा शिवराळ आहे. बीड जिल्हा हा कुणाची जहागिरी नाही तर आगामी विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील पाचही मतदारसंघात ओबीसीचेच आमदार निवडुण आणा, असे आवाहन प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांनी ओबीसी समाजबांधवांना संवाद यात्रा व मेळाव्यात केले.**

शहरातील वसंतराव नाईक चौकातून ओबीसी समाजाबांधवांनी डॉ. आंबेडकर चौक, छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज चौक मार्गे ही अभूतपुर्व मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीचे जाहिर सभेत रूपांतर वैष्णवी मंगल कार्यालयात गुरूवार दि. २५ जुलै २०२४ रोजी करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते महापुरूषांच्या प्रतिमेचे पुजन करून सभेची सुरूवात करण्यात आली. सकल ओबीसी समाजबांधवांच्या वतीने हाके आणि वाघमारे यांचा लहान मुलींच्या हस्ते पुष्पहाराने स्वागत करण्यात आले. यावेळी बोलतांना नवनाथ वाघमारे म्हणाले की, ◀◀ पान २ वर



### मोटारसायकल रॅलीत शेकडोंचा सहभाग

ओबीसी नेते प्रा. लक्ष्मण हाके, नवनाथ वाघमारे यांचे तेलगाव, नित्रुड, पात्रुड, लहामेवाडी, लवुळ, ढोरगाव याठिकाणी रस्त्यावर स्वागत करण्यात आले तर वसंतराव नाईक चौक मार्गे शहरातील मुख्य रस्त्यावरून बाबासाहेब आंबेडकर चौक, छ. शिवाजी महाराज, छ. संभाजी महाराज चौक मार्गे रॅली काढण्यात आली. रॅलीवर जेसीबीच्या सहाय्याने पुष्पवृष्टी व क्रेनच्या सहाय्याने पुष्पहार घालण्यात आला. रॅलीमध्ये तरूणवर्गाची मोठी उपस्थिती होती.

# आणखी २ दिवस पावसाचे टेन्शन!

## अतिवृष्टी, अनेक ठिकाणी अलर्ट



**पुणे । प्रतिनिधी**

मुंबईसह पालघर, ठाणे, मुंबई, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूरला शुक्रवार दि. २६ जुलै रोजी मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. पुण्यात पुढील दोन दिवस मुसळधार पाऊस कायम राहणार असल्याची शक्यता हवामान विभागाने ◀◀ पान २ वर

## काँग्रेस पाठोपाठ आता आपचा निती आयोगाच्या बैठकीवर बहिष्कार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी मंगळवारी (ता.२३) अर्थसंकल्प सादर केला. त्यानंतर हा अर्थसंकल्प भेदभावपूर्ण असल्याचे म्हणताना विरोधकांनी याला विरोध केला. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या २७ जुलैच्या निती आयोगाच्या बैठकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय देशातील चार मुख्यमंत्र्यांनी घेतला. यापाठोपाठ आता आप ◀◀ पान २ वर




## मंत्री अतुल सावे, ॲड.सुभाष राऊत यांनी घेतला कार्यक्रमाच्या तयारीचा आढावा

**बीड । प्रतिनिधी**




संत शिरोमणी श्री सावता महाराजांचे जन्मगाव अरण, ता.माढा, जि.सोलापूर येथे ४ ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगनराव भुजबळ व गृहनिर्माण व ईतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या प्रमुख उपस्थितीत भक्तनिवास, वास्तुशिल्प भूमिपूजन सोहळा संपन्न होणार आहे. या ठिकाणी पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी ◀◀ पान २ वर

## अतिवृष्टीने शेतकऱ्यांची झालेली नुकसान भरपाई द्या

### विजय वडेट्टीवार यांची मागणी

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यात अतिवृष्टीमुळे मोठे नुकसान झाले असून राज्यात हजारो हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे. अतिवृष्टीमुळे शेतकरी पुन्हा संकटात सापडला असून शेतकऱ्यांना सरकारने भरीव मदत केली पाहिजे अशी मागणी विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली. त्याचबरोबर नागरिकांनी जीव धोक्यात घालून घराबाहेर पडू नये, असे आवाहन केले.**



राज्यात काही दिवसांपासून पूर्व विदर्भ, पुणे, कोल्हापूर, रायगड या जिल्ह्यात अतिमुसळधार पाऊस सुरू आहे. येत्या काही तासात पुणे शहर, भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला परिसरात गंभीर परिस्थिती निर्माण होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. हवामान ◀◀ पान २ वर

## अब्दुल सत्तार छत्रपती संभाजीनगरच्या पालकमंत्रिपदी

**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या पालकमंत्रिपदी पणन आणि अल्पसंख्याक विकास मंत्री अब्दुल सत्तार यांची नियुक्ती जाहीर करण्यात आली आहे. पैठणचे आमदार तथा राज्याचे रोहयो मंत्री संदिपान भुमरे यांनी लोकसभा निवडणूक जिंकल्याने त्यांच्या जागी पालकमंत्री कोण होणार, असा प्रश्न निर्माण झाला होता. आमदार संजय शिरसाट यांना मंत्रिपदाची लॉटरी लागेल, असे वाटत ◀◀ पान २ वर

## १५ खासदार असलेला पक्ष इंडिया आघाडीत आणणार

### अखिलेश यादवांची मोठी खेळी, भाजपला झटका

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव मोठी खेळी खेळण्याच्या तयारीत आहेत. १५ खासदार असलेला पक्ष इंडिया आघाडीत आणत भाजपला मोठा झटका देण्याची तयारी अखिलेश यांनी केली आहे. लोकसभा निवडणूक पार पडल्यानंतर काही अपक्ष खासदार इंडिया आघाडीसोबत आलेले पाहायला मिळाले. त्यामुळे इंडिया आघाडीची ताकद हळूहळू वाढताना दिसत आहे. सध्या अखिलेश यादव यांच्या मदतीने १५ खासदार असलेला पक्ष इंडिया आघाडीसोबत येण्याची शक्यता आहे.

आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री आणि वायएसआर काँग्रेसचे प्रमुख जगनमोहन रेड्डी यांनी बुधवारी (दि.२४) राजधानी दिल्लीत जोरदार शक्तिप्रदर्शन केले. राज्यात सत्ता मिळवल्यानंतर आणि केंद्रातील सत्तेत सहभागी झाल्यानंतर तेलगू देसम पक्षाने जगनमोहन रेड्डी यांच्या पक्षाविरोधात हिंसकरुप धारण केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. जगनमोहन रेड्डी यांच्या आंदोलनाला इंडिया आघाडीची साथ मिळाली ◀◀ पान २ वर

## केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत ८ ऑगस्टपर्यंत वाढ

**नवी दिल्ली । वृतसंस्था**



दिल्ली मद्य धोरण घोटाळ्यातील सीबीआय प्रकरणात राऊस एव्हेन्यू कोर्टाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत ८ ऑगस्टपर्यंत वाढ करण्यात आली आहे. आज तिहार कारागृहातून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सुनावणी झाली.याआधी ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२५ जुलै २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ७.५० क्विंटल | २,००० | ३,२१२ | २,५९८ |
| ज्वारी/हायब्रिड :२४.५० क्विंटल | २,१०० | २,४८० | २,२६९ |
| मूग :१४.५० क्विंटल | १,९५० | ३,०४१ | २,४५५ |
| तूर : १४.५० क्विंटल | १०,२०० | १०,३७२ | १०,२८६ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,००१ | ४,००१ | ४,००१ |
| बाजरी: १८.०० क्विंटल | २,४७० | ३,००० | २,६७० |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: ११८.०० क्विंटल | ४,४०० | ४,४०० | ४,४०० |
| हरभरा: २.०० क्विंटल | ५,३०० | ६,५५१ | ५,९२५ |

## खनिजांवर गोळा केलेली रॉयल्टी कर नाही !

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्वपुर्ण निर्णय



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने गुरूवारी (दि.२५) ऐतिहासिक निकाल देताना, पूर्वीचे आदेश रद्द करत खाण आणि खनिज–वापराच्या क्रियाकलापांवर रॉयल्टी लावण्याचे राज्यांचे अधिकार कायम ठेवले. ''खनिजांवर गोळा केलेली रॉयल्टी हा खाण आणि खनिजे (विकास आणि नियमन) कायदा, १९५७ अंतर्गत कर नाही. खाण आणि खनिजे कायदा कर गोळा करण्याच्या राज्यांच्या अधिकारांवर मर्यादा घालत नाही. राज्यांना खनिजे आणि खाण जमिनींवर कर वसूल करण्याचा अधिकार आहे'', असे खंडपीठाने ८ :१ अशा बहुमताने दिलेल्या निकालात म्हटले आहे. हा निकाल खनिज संपन्न राज्यांसाठी महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

खनिजांवर देय असलेली रॉयल्टी हा खाण आणि खनिज (विकास आणि नियमन) कायदा, १९५७ अंतर्गत कर आहे की नाही या अत्यंत महत्त्वपूर्ण मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालय सुनावणी सुरु होती. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील नऊ सदस्यीय घटनापीठाने विविध राज्ये, खाण कंपन्या आणि सार्वजनिक उपक्रमांच्या ८६ याचिकांवर आठ दिवस सुनावणी घेतल्यानंतर १४ मार्च रोजी निकाल राखून ठेवला होता. खनिजांवर देय असलेली रॉयल्टी वसुली करण्याचा अधिकार फक्त केंद्राला आहे की राज्यांनाही त्यांच्या प्रदेशातील खनिज–समृद्ध जमिनीवर कर लावण्याचा अधिकार आहे का, याबाबत सरन्यायाधीश ◀◀ पान २ वर




cmyk

## अग्रलेख

# तरुणाईच्या भवितव्याशी धोकादायक खेळ

सर्वोच्च न्यायालयाने नीट-यूजी परीक्षा रद्द करण्यास नकार दिला आहे. परीक्षेचे पेपर नियोजनबद्ध पद्धतीने लीक झाले होते हे सांगणारे कोणतेही पुरावे उपलब्ध नाहीत असे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील तीन न्यायमूर्तींच्या खंडपीठाने म्हटले आहे. त्यामुळे परीक्षेच्या पावित्र्यावर कोणतेही प्रश्नचिन्ह उपस्थित होत नाही म्हणून न्यायालयाने पुन्हा परीक्षा घेण्याचा आदेश देण्यास नकार दिला. परंतु या प्रकरणाची चौकशी सुरू राहील. जर एखाद्या विद्यार्थ्याला चुकीच्या पद्धतीने फायदा होत आहे असे दिसल्यास त्या विद्यार्थ्याला नंतर शिक्षा दिली जाईल. फेरपरीक्षा घेतली तर २० लाखांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांवर त्याचा गंभीर परिणाम होईल. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेवरही परिणाम होईल. एकूणच वैद्यकीय शिक्षणावरही त्याचा परिणाम होईल तसेच भविष्यात डॉक्टरांचा तुटवडा निर्माण होईल. समाजातील निम्नस्तरातील विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्यासाठी आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. त्यांचेही या प्रक्रियेत नुकसान होईल. या कारणांमुळे संपूर्ण नीट परीक्षा रद्द करणे योग्य होणार नाही असा निर्णय न्यायालयाने दिला आहे. न्यायालयाच्या आदेशानंतर परीक्षेच्या निकालातही फरक पडणार आहे. कारण एका प्रश्नाबद्दल गोंधळ आहे.

एका प्रश्नात २ आणि ४ हे दोन्ही पर्याय योग्य आहेत असे मार्क करणाऱ्या विद्यार्थ्यांना एनटीएने गुण दिले आहेत. त्यासाठी न्यायालयाने आयआयटी दिल्लीला याबद्दल स्पष्टीकरण मागितले होते. सुमारे ४.२ लाख विद्यार्थ्यांनी चुकीचे उत्तर दिले होते. पण त्यांना एनटीएने गुण दिले होते. आता त्यांना हे गुण गमवावे लागणार आहेत. आयआयटीने एक समिति स्थापन करून गोंधळ टाळण्यासाठी पर्याय ४ हे या प्रश्नाचे योग्य उत्तर आहे असा निर्वाळा दिला. त्यामुळे आता परीक्षेचा निकाल बदलणार आहे. आमचा आदेश नीट परीक्षेचे पावित्र्य समोर ठेवून देण्यात आला आहे असे न्यायालयाने म्हटले आहे. जर एखाद्या विद्यार्थ्याची काही तक्रार असेल तर कायदेशीर मार्गाने जाण्यासाठी तो स्वतंत्र आहे. असे विद्यार्थी त्यांच्या मागण्या घेऊन उच्च न्यायालयात जाऊ शकतात, त्यांना तो हक्क आहे असे सरन्यायाधीशांनी म्हटले आहे. केंद्र सरकारने स्थापन केलेल्या सात सदस्यीय समितीकडे ते आपला अहवाल पाठवतील असेही न्यायालयाने म्हटले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार एनटीएद्वारे घेतल्या जाणाऱ्या नीट-यूजी आणि इतर परीक्षा प्रक्रिया मजबूत करण्याचे आणि भविष्यात अशा चुका टाळण्याचे काम होऊ शकेल. नीट-यूजी परीक्षेत १५६३ विद्यार्थ्यांना देण्यात आलेले ग्रेस मार्क रद्द करून त्यांची पुनर्परीक्षा घेणार असल्याचे एनटीएने १३ जूनला सुप्रीम कोर्टात सांगितले होते. सुप्रीम कोर्टात १३ जूनला नीट-यूजी परीक्षेसंदर्भातील तीन याचिकांवर सुनावणी झाली. वेळेचे नुकसान झाल्याचे कारण देत १५६३ विद्यार्थ्यांना मनमानी पद्धतीने ग्रेस मार्क देण्यात आले होते असा आरोप करत परीक्षा रद्द करण्याची मागणी करण्यात आली होती. नीट परीक्षेचा निकाल ४ जूनला जाहीर करण्यात आला. विविध कारणांमुळे देशभरातील विद्यार्थ्यांनी या निकालावर आक्षेप घेत, परीक्षेचे आयोजन योग्य प्रकारे करण्यात आले नसल्याने परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी करण्यात आली होती. महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ यांनीही नीट परीक्षा पुन्हा घेण्यात यावी अशी मागणी केली होती. नीट परीक्षेचा पेपर फुटला, त्यात काही गैरप्रकार झाले हे उघड आहे. या परीक्षेचे गांभीर्य आणि पावित्र्य घालवल्याचा ठपका ही परीक्षा घेणाऱ्या यंत्रणेवर ठेवण्यात आला. मात्र, नीट-यूजी परीक्षेचा निकाल जाहीर करू नये तसेच ही परीक्षा रद्द करून नव्याने परीक्षा घेण्यात यावी ही मागणी व्यवहार्य आणि शहाणपणाची नव्हती. देशभरातील वैद्यकीय प्रवेशाच्या १ लाख ८ हजार जागांसाठी ही परीक्षा घेण्यात आली होती. सुमारे २४ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली होती. परीक्षेचा निकाल जाहीर न करता परीक्षाच रद्द करून नव्याने परीक्षा घेण्यात यावी ही मागणी वर्षभरापासून या परीक्षेची तयारी करणारे विद्यार्थी तसेच त्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे सहभागी असलेले त्यांचे पालक यांच्यावर अन्यायकारकच होती. नव्याने परीक्षा घ्यायची म्हटले की त्याच्या तयारीसाठी किमान एक महिन्याचा वेळ जाणार आणि परीक्षेचा निकाल जाहीर करण्यासाठी पुन्हा महिनाभराचा कालावधी लागणार. त्यामुळे वैद्यकीय प्रवेशाचे संपूर्ण वेळापत्रक कोलमडले असते. उशिरा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत असते. तो अन्य विद्यार्थ्यांच्या मागे पडतो. त्यामुळे परीक्षेचा निकाल रोखून परीक्षा रद्द करावी तसेच नव्याने परीक्षा घ्यावी, ही मागणी रोगापेक्षा उपचार भयंकर अशा स्वरूपाची ठरली असती. दुसरे म्हणजे नव्याने परीक्षा घेतली असती तर पुन्हा पेपर फुटणार नाही,

गैरप्रकार होणार नाहीत याची खात्री कोण देणार होते? पेपरफुटीला आळा घालण्यासाठी केंद्राने नुकताच कायदा केला आहे. मात्र, कायदा पाळण्याची इच्छाशक्ती आणि मानसिकता असेल तरच कायदा उपयोगी ठरतो. आपल्याकडे कायद्यातून पळवाटाच अधिक शोधल्या जातात. तसेच गुन्हेगार कोण हे बघूनच यंत्रणा कार्यरत होतात. मग कायदा राबविला जाणार कसा? पैशाने कुठलीही परीक्षा विकत घेता येते हे कटु वास्तव आहे. परीक्षांमधील घोळ हा देशाच्या तरुणाईच्या भवितव्याशी खेळला जाणारा धोकादायक खेळ आहे. त्यामुळे देशाचे, तरुणाईचे नुकसान होणार आहे. तरुणाई पेटून उठली तर होणारा गदारोळ थांबवता येणार नाही.

# पोलीस निरीक्षक व तहसीलदार यांना निलंबित करा-सकल मुस्लिम समाज

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील दिंद्रुड येथिल सकल मुस्लिम समाज बांधव च्या वतीने उपविभागीय अधिकारी माजलगाव कार्यालयासमोर दि २४ जुलै २०२४ रोजी सकाळी ११ वाजता पासुन अमरण उपोषण करण्यात आले या वेळी खालील मागण्या दिंद्रुड येथील मयतेच्या कुटुंबियांवर दुरुपयोग करून अन्याय कारक रित्या ७४ जनांनवर दाखल केलेला गुन्हा न. २७५ / २०२४ तात्काळ रद्द करून पोलीस निरीक्षक केतन राठोड यांच्यावर निलंबानी कारवाई करण्यात यावी. राजकीय दबावाला बळी पडुन २५/०४/२००२४ रोजी तहसीलदार वर्षा बनाळे यांनी चुकीचे आदेश दिल्या बद्दल यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्यात यावी मौजे दिंद्रुड शिवारातील गट क्र.७१३ मधील १ हेक्टर २० आर जमीन ज्यांची महाराष्ट्र शासन राज्यपत्र १४ फेब्रुवारी १९७४ मध्ये मुस्लिम कब्रस्तान यांची नोंद आहे त्या जमिनीमध्ये भरत असलेले अनधिकृत आठवडी बाजार तात्काळ बंद करण्यात यावे दिनांक २० /११/ २००७ रोजी जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय बीड यांनी ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय दिंद्रुड तालुका माजलगाव यांना दिलेल्या पत्रात बाजार भरण्यास सक्त मनाई केलेली आहे त्या आदेशाचे पालन करावे दिनांक २७/ ७ /२०१६ /रोजी भूमि अभिलेख महाराष्ट्र शासन यांच्यामार्फत गट क्रमांक ३३१ झालेले मोजणी मोर क्रमांक ७२/२०१६ यांच्या मोजणी नुसार सदर कब्रस्तानची जमीन अतिक्रमण मुक्त करून घ्यावी वरील सदर मागण्या तात्काळ माण्य करून कब्रस्तानची विटंबना तात्काळ थांबवावी याकरिता दिंद्रुड येथिल सकल



मुस्लिम समाज बांधवांच्या वतीने आमरण उपोषण उपविभागीय अधिकारी माजलगाव येथे करण्यात आले सविस्तर वृत असे की मा. उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशाचे पालन करून मयतास दफन विधी साठी घेवून गेले या सर्व प्रकरणात दिंद्रुड परिसर असेल किंवा माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या हद्दीत असेल मयताच्या नातेवाईकांनी कसल्याही प्रकारे कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचे कार्य केलेले नव्हते व प्रशासनाला पुर्ण सहकार्य केले असे असतांना ही माजलगाव शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक केतन राठोड यांनी राजकीय दबावापोटी जानीव पूर्वक मयताच्या नातेवाईकांना लक्ष करीत आपल्या पदाचा दुरुपयोग करुन मयताचे ४ नातेवाईक व इतर ७० ते ७४ जनांविरुद्ध गुन्हा नं.२७५/२०२४ हा खोटा गुन्हा दाखल केला. व दि.०७/ ०७/२०२४ च्या रात्रीपासुन ते दि.०८/०७/२०२४ च्या संध्याकाळी ०६ वाजे पर्यंतच्या भूखेने व्याकुल झालेल्या मानसीक दृष्ट्या खचलेल्या भयभित झालेल्या नातेवाईकास वेठ्ठीस धरले म्हणुन मा. साहेबांनी सदर दाखल केलेले खोटे गुन्हे तात्काळ वापस घेण्याचे आदेशीत करावे व माजलगाव शहरात व तालुक्यातील मुस्लीम अल्पसंख्यांकांना पोलीस स्टेशनमध्ये फिर्याद घेवून येणाऱ्या मुस्लीम फिर्यादीला शिवी गाळ करणाऱ्या मुस्लीम समाजाबद्दल द्वेश भावनेनेन कार्यवाही करणाऱ्या जातीय वादी मानसीकता बाळगुन कार्य करणाऱ्या माजलगाव शहर पोलीस स्टेशनच्या पोलीस निरीक्षक केतन राठोड वर चौकशी करुन निलंबन करावे आणी माजलगाव तहसिलदार वर्षा मनाळे यांची चौकशी करुन निलंबन करावे,व अन्य आम्ही सर्व मयताचे नातेवाईक दिंद्रुड शहरातील मुस्लीम नागरीक दि.२४ / ०७/२०२४रोजी माजलगाव उपविभागीय कार्यालया समोर अमरण उपोषण करण्यात आले या वेळी मा उपविभागीय अधिकारी माजलगाव यांनी लेखी पत्र दिंद्रुड येथिल उपोषण कर्त्यास देवुन कळविले की दिंद्रुड च्या प्रकरणात वरील विषयात कार्यवाही करण्याचे अधिकार मा जिल्हाधिकारी बीड यांना असल्याने दिंद्रुड येथिल सकल मुस्लिम समाजाच्या वतीने अमरण उपोषण मागे घेण्यात आले पुढील उपोषण मा जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात येईल असे दिंद्रुड येथिल ग्रामस्थांनी आमच्या प्रतीनिधीशी बोलतांना सांगितले आहे

## डॉक्टर, तलाठी, इंजिनीयर, व्यापारी आणि अपंगाची नावे मजुरांच्या यादीत

# 'रोजगार हमी अर्धे तुम्ही अर्धे आम्ही' असा प्रकार-ॲड.अजित देशमुख

**बीड । प्रतिनिधी**

**रोजगार हमी योजना ही भ्रष्टाचाराने पूर्णपणे व्यापली आहे. ''रोजगार हमी, अर्धे आम्ही आणि अर्धे तुम्ही'' या म्हणीप्रमाणे जिल्ह्यात कोट्यावधी रुपयांची लुट चालू आहे. मजुरांच्या यादीमध्ये चक्क डॉक्टर, तलाठी, इंजिनियर, व्यापारी अशा मान्यवरांसह आणि अपंगांची नावे नोंदवली असून त्यांच्या नावे मजुरी उचलली आहे. त्यामुळे या नोंदी घेणाऱ्या अधिकाऱ्यांना अगोदर जेलमध्ये घातले पाहिजे, असे जन आंदोलनाचे विश्वस्त अँड. अजित एम. देशमुख यांनी म्हटले आहे.**

बीड जिल्ह्यात भ्रष्टाचार कसा करावा, यासाठी संशोधन केले जाते. महाराष्ट्रात जे घडत नाही, ते बीड जिल्ह्यात घडत असते. रोजगार हमी मध्ये देखील कमाईची हमी असल्याने गाव पातळीवरचे लोकप्रतिनिधी, गाव पातळीवरचे आणि तालुका स्तरावरचे अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासह जिल्हा परिषदेतील अधिकाऱ्यांपर्यंत सर्व मान्य घोटाळा रोजगार हमी योजनेत दिसत आहे. बंगाली पिंपळा, ता. गेवराई येथील सहा ग्रामपंचायत सदस्यांनी याबाबत जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, गेवराई, गटविकास अधिकारी, रोजगार हमी योजना, बीड यांच्या सह शासनाकडे तक्रार केली होती. प्रशासनाच्या रिती रिवाजाप्रमाणे या प्रकरणाची सुनावणी झाली. रोजगार हमी योजने मध्ये काही तक्रारी असतील, तर त्याची तक्रार जिल्हाधिकारी कार्यालया मधील तक्रार निवारण प्राधिकारी, रोहयो, बीड यांच्याकडे करावी लागते. यांच्याकडे या तक्रारीवर सुनावणी होत असते. बंगाली पिंपळाच्या या घोटाळ्याची सुनावणी डॉक्टर के. व्ही. गवते, तक्रार निवारण प्राधिकारी, रोहयो, बीड यांच्याकडे झाली आणि त्यांनी चक्क ठोस पुरावा आढळत नाही, असे कारण दाखवून ठोस पुराव्या अभावी ही तक्रार फेटाळली आहे. यावरून यातील गांभीर्य अजून दिसून येते. कोट्यावधी रुपये एका-एका ग्रामपंचायतीला जातात. मध्यंतरी जवळपास सोळा कोटी रुपयांची कामे फक्त सोळा महिन्यात धोंडराई ता. गेवराई या गावात आलेली आहेत. त्याची आम्ही चौकशी लावल्यानंतर, चौकशी अधिकारी अहवाल द्यायला तयार नाहीत. हेच लोक दुसऱ्या कुणाची तक्रार असेल तर दोन दिवसात हवा देऊन मोकळे होतात. आता ते एवढे का घाबरले आहेत ? हा सुद्धा मोठा प्रश्न आहे. त्यातच बंगाली पिंपळाचा हा प्रकार उघडकीस आला आहे. बंगाली पिंपळा तालुका गेवराई येथील सहा तक्रारदार हे ग्रामपंचायत सदस्य आहेत. या सहा सदस्यांनी ही तक्रार नोंदवली आहे. या तक्रारीची तात्काळ दखल घेतली गेली असती, तर गावातील विकास कामे चांगली झाली असती. मात्र चांगली कामे करायची नाहीत, हे एकदा प्रशासनाने ठरविले की, हप्ते खोरीला वाव मिळतो. त्यामुळे तक्रारदारांची तक्रार धुडकवण्यात आली. मात्र त्यांनी अजूनही माघार घेतलेली नाही. त्यामुळे प्रशासनाने या तक्रारीकडे गांभीर्याने पहावे. अन्यथा आम्हालाही या तक्रारदारांबरोबर आंदोलन करावे लागेल, असेही अँड. अजित देशमुख यांनी म्हटले आहे.

# कंगना रनौत यांची खासदारकी रद्द करा

## याचिकेवर हायकोर्टाने जारी केली नोटिस

**मंडी। प्रतिनिधी**

**हिमाचल प्रदेशमधील मंडी लोकसभा मतदार संघाच्या भाजप खासदार कंगना रनौत यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे. लायक राम नेगी नावाच्या एका व्यक्तीने हायकोर्टात दाखल केलेल्या याचिकेत कंगना यांची खासदारकी रद्द करण्याची मागणी केली. याचिकेची दखल घेत हिमाचल हायकोर्टाने कंगना रनौत यांना नोटीस जारी केली आहे. जस्टिस ज्योत्सना रेवाल यांनी भाजप खासदार कंगना रनौत यांना २१ ऑगस्ट रोजी आपले उत्तर देण्याचे निर्देश दिले आहे.**

कंगना रनौत यांनी काँग्रेस उमेदवार विक्रमादित्य सिंह यांना ७४ हजार, ७५५ मतांनी हरवले होते. वन विभागाचे माजी कर्मचारी असलेले लायक राम नेगी यांनी दाखल केलेल्या याचिकेत महटलं आहे की, लायक यांना लोकसभा निवडणूक लढवायची होती. पण मंडीच्या निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांचे नामांकन अर्ज चुकीच्या पद्धतीने नाकारले. आपल्या याचिकेत लायक राम नेगी यांनी सांगितले की, नामांकनावेळी त्यांच्याकडून सरकारी निवासाचे वीज, पाणी आणि टेलिफोनचे नो ड्यूज सर्टिफिकेट आणण्यास सांगण्यात आले होते. यासाठी त्यांना एका दिवसाचा वेळ देण्यात आला होता. मग त्यांनी सर्व कागदपत्रे जमा केली. जेव्हा पुढील दिवशी त्यांनी रिटर्निंग ऑफिसरला कागदपत्रे दिली तर त्यांनी घेण्यास नकार दिला. मग नामांकन नाकारले. लायक राम नेगी यांनी कोर्टात सांगितले की, जर त्यांचा नामांकन अर्ज स्वीकारला असता तर आज ते निवडणूक जिंकले असते. नेगी यांनी हायकोर्टाकडे कंगना रनौत यांची खासदारकी रद्द करणे आणि पुन्हा निवडणूक घेण्याची विनंती केली आहे.

## पान १वरून...

### नाशिक, छ, संभाजीनगर,

असे सांगतानाच शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था यांच्या माध्यमातून प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात यावी जेणे करून शेतकऱ्यांचे हित डोळ्यासमोर ठेवून काम होईल. कांदा बँक परिसरात मुल्य साखळी विकसित करण्याचे देखील मुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले. यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे, जेएनपीटी, अपेडा, डॉ. भाभा अणुसंशोधन केंद्र यांचे संचालक, अधिकारी उपस्थित होते. माहिती, राज्यात नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर येथे कांदा महाबँक

------------

### आणखी २ दिवस

व्यक्त केली आहे. सांगली, औरंगाबाद, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेडला जोरदार पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. या जिल्ह्यांत पुढील ४ दिवस पावसाचा जोर राहणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. चंद्रपूर, गडचिरोली जिल्ह्याला मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. यवतमाळमध्येही जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. कोकणातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रातील जिल्ह्यांमध्ये घाट भागात तुरळक ठिकाणी मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी मुसळधार आणि विदर्भातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळ, सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मुंबई शहर आणि उपनगरात मुसळधार ते अति मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. काही ठिकाणी अतिवृष्टी होईल. अधूनमधून ६०-७० किमी ताशी वेगाने वारे वाहण्याची शक्यता असल्याचे मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने म्हटले आहे.

-----------

### जरांगे पाटील हे बारामतीच्या

जरांगे पाटील हे ओबीसी समाजातील धनगर, वंजारी, बंजारा यांच्या आरक्षणाला पाठींबा देउन त्यांना या आंदोलनातून बाजुला करण्याचा प्रयत्न करतात आणि अठरा पगड जातीच्या ओबीसींच आरक्षण लाटण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचाही आरोप त्यांनी केला. यावेळी मेळाव्यात बोलतांना प्रा. लक्ष्मण हाके म्हणाले की, ओबीसी आरक्षणाचा मंडल आयोग १९९३ - ९४ मध्ये लागु झालेला आहे परंतु जरांगे म्हणतात की ७० वर्षांपासून आरक्षण खाल्लं. यावरून लक्षात येते की जरांगे पाटलांना आरक्षणाचा सामाजिक अभ्यास नसतांना ते मनमानी पध्दतीने वाटेल तसे बडबडतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी एससी, एसटी, ओबीसींना आरक्षण दिले आहे तर आरक्षण हे गरिबी हटाव नसून ते दिन, दलित, वंचित, पिढीत यांना समाजाच्या प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण दिले आहे परंतु या राज्यामध्ये मराठा समाज हा जमिनदार, कारखानदार, शिक्षणसम्राट आहे आणि अठरा पगड जातींच्या ओबीसींच्या नावावर सातबारा नाही म्हणुन ओबीसी आरक्षणाची लढाई लढण्यासाठी ओबीसींन एकसंघ होउन तिव्रपणे आरक्षण बचाव लढ्यात उतरावे तर जरांगे पाटील हे बारामतीच्या स्क्रिप्टनुसार बोलतात ती स्क्रिप्ट आ. राजेश टोपे आणुन देतात आणि जरांगे पाटील त्या स्क्रिप्टवर चालतात असा आरोप करत त्यांनी बीड जिल्हा ही कुणाची जहागिरी नसून जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदारसंघात ओबीसींचे आमदार करा असे आवाहन त्यांनी समाजबांधवांना केले.

-------

### अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांची

खात्याचा हा अंदाज आणि अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षनेते वडेट्टीवार यांनी गुरूवारी माध्यम प्रतिनीधींशी संवाद साधला. पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, मुंबई आणि पुण्यासारखी मोठी शहरे अतिवृष्टीमुळे जलमय झाली आहेत. या मोठ्या शहरातील मोडकळीस आलेल्या इमारतीमधील नागरिकांच्या निवाऱ्याची व्यवस्था सुरक्षितस्थळी करण्यात यावी. विदर्भातील चंद्रपूर, गडचिरोली, वर्धा जिल्ह्यात अतिवृष्टी सुरू आहे. पालकमंत्री आणि जिल्हा प्रशासनाने सतर्क राहून तेथे नागरिकांना मदत करावी. नागरिकांनी जीव धोक्यात घालून घराबाहेर पडू नये. नद्या, नाले, ओढे, धबधबे, धरण, दरडप्रवण क्षेत्र, घाट, पूरप्रवण क्षेत्र, पर्यटनस्थळे अशा ठिकाणी नागरिकांनी जाणे टाळावे, असे आवाहनही केले. अलमट्टी धरणामुळे कोल्हापूर, सांगली शहरांना पुराचा धोका होऊ नये यासाठी काँग्रेस नेते आमदार सतेज पाटील यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांची भेट घेऊन विस्तृत चर्चा केली असल्याचेही विजय वडेट्टीवार यांनी सांगितले.

----------

### मंत्री अतुल सावे, ॲड.सुभाष राऊत यांनी

राज्याचे मंत्री अतुल सावे यांच्यासह समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष तथा सिनेट सदस्य ॲड.सुभाष राऊत हे उपस्थित होते. या वेळी श्री संत शिरोमणी सावता महाराज यांचे वंशज रविकांत महाराज वसेकर, सावता महाराज वसेकर व प्रभू महाराज माळी, ॲड.सतीश शिंदे, प्रा.अमर हजारो हे उपस्थित होते. या वेळी संत सावता महाराज यांचे दर्शन घेऊन सभामंडप पायाभरणी करून पुजन करण्यात आले आणि भोजन व्यवस्था, पार्किंग व्यवस्था यासह महत्वाच्या गोष्टीचा आढावा घेतला. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

### काँग्रेस पाठोपाठ आता आपचा

पक्षाने देखील जुलैच्या निती आयोगाच्या बैठकीवर बहिष्कार टाकण्यात निर्णय घेतला आहे. त्यामुळे नीती आयोगाच्या बैठकीला आता मुख्यमंत्री भगवंत मान जाणार नसून आप इंडिया आघाडीच्या सोबत जाण्याचा निर्णय घेतल्याचे आप प्रवक्ते नील गर्ग यांनी सांगितले. याआधी कर्नाटक, तमिलनाडु, तेलंगाना आणि हिमाचल प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी निती आयोगाच्या बैठकीवर बहिष्कार निर्णय घेतला होता. ज्यात काँग्रेसच्या तीन मुख्यमंत्र्यांचा समावेश आहे. यानंतर आता पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांनी देखील बैठकीला न जाण्याचा निर्णय पक्षाच्या आदेशानंतर घेतला आहे. यावेळी आप पक्ष इंडिया आघाडीच्या पाठीशी उभा आहे. त्यामुळे निती आयोगाच्या बैठकीबाबत इंडिया आघाडीने जो निर्णय घेतला आहे. त्याप्रमाणे पंजाबचे मुख्यमंत्री देखील बैठकीपासून दूर राहतील. आघाडी पेक्षा वेगळा निर्णय घेतला जाणार नाही. दरम्यान मुख्यमंत्री मान हे आयोगाच्या बैठकीला उपस्थित राहणार होते. तर ते केंद्राकडे प्रलंबित १० हजार कोटी रुपयांचा मुद्दा उपस्थित करणार होते. या रखडलेल्या १० हजार कोटींमध्ये ग्रामीण विकास निधी आणि मंडी विकास निधीचे ६,७६७ कोटी रुपयांचा समावेश आहे. यंदाचा अर्थसंकल्प विकसित भारताचा अजेंडा पुढे नेणारा असल्याचा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदींसह भाजपच्या अनेक नेत्यांनी केला. मात्र विरोधी इंडिया आघाडीने हा अर्थसंकल्प भेदभावपूर्ण असल्याचे म्हटले असून, याला तीव्र विरोध करू असे आघाडीतील नेत्यांनी म्हटले होते. संसदेबाहेर इंडिया आघाडीकडून आंदोलन करण्यात आले. तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या २७ जुलैच्या निती आयोगाच्या बैठकीवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय देशातील चार मुख्यमंत्र्यांनी घेतला. यात काँग्रेसच्या तेलंगणाचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी, कर्नाटकचे सिद्धरामय्या आणि हिमाचल प्रदेशचे सुखविंदर सिंग सुखू यांचा समावेश आहे. तसेच डीएमकेचे मुख्यमंत्री एमके स्टॅलिन यांनी देखील निती आयोगाच्या बैठकीवर बहिष्कार टाकला आहे.

-----------

### केजरीवाल यांच्या न्यायालयीन

१२ जुलै रोजी सीबीआयमार्फत तपास करत असलेल्या अबकारी धोरणाशी संबंधित भ्रष्टाचार प्रकरणात न्यायालयाने मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीत शुक्रवारी २५ जुलैपर्यंत वाढ केली होती. केजरीवाल यांनी केंद्रीय अन्वेषण विभागा (सीबीआय) ने केलेल्या अटकेला आव्हान देणाऱ्या याचिकेवरील निकाल दिल्ली उच्च न्यायालयाने १७ जुलै रोजी राखून ठेवला आहे. केजरीवाल यांनी त्यांची अटक बेकायदेशीर असल्याचे म्हटले आहे. संपूर्ण पुरावे उपलब्ध झाल्यानंतरच कायद्यानुसार अटक करण्यात आल्याचा दावा सीबीआयने केला आहे. न्यायमूर्ती नीना बन्सल कृष्णा यांनीही केजरीवाल यांच्या अंतरिम जामीन याचिकेवरील निर्णय राखून ठेवला आहे.

----------

### १५ खासदार असलेला पक्ष इंडिया

आहे. जगनमोहन रेड्डी यांच्या आंदोलनात अखिलेश यादवही सहभागी झाले. त्यानंतर जगनमोहन रेड्डी यांची वायएसआर काँग्रेस इंडिया आघाडीत सहभागी होणार असल्याच्या चर्चा आहे. वायएसआर काँग्रेस इंडिया आघाडीत सहभागी होणार असल्याच्या चर्चा सत्तेत उतरल्या तर विरोधी पक्षांची ताकद मोठी असणार आहे. जगनमोहन रेड्डी यांच्या वायएसआर काँग्रेसचे लोकसभेत केवळ चार खासदार आहेत. मात्र, राज्यसभेत जगनमोहन रेड्डी यांची मोठी ताकद आहे. राज्यसभेत त्यांचे ११ खासदार आहेत. राज्यसभेतील हा आकडा अतिशय मोठा आकडा असल्याची माहिती आहे.

**एनडीएला बहुमताच्या आकड्यापासून १३ जागा कमी**

राज्यसभेत एकूण २४५ जागा आहेत, परंतु १९ जागा रिक्त असल्याने संसदेच्या उच्च सभागृहाचे एकूण संख्याबळ सध्या २२६ आहे. अशा स्थितीत राज्यसभेतील संदस्यांचा आकडा ११३ होतो. वृत्तानुसार, सध्या राज्यसभेत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील एनडीएला बहुमताच्या आकड्यापासून १३ जागा कमी आहेत. राज्यसभेत भाजपच्या ८६ जागा असून एनडीएचे एकूण १०१ खासदार आहेत.

------------

### अब्दुल सत्तार छत्रपती

असताना अब्दुल सत्तार यांची नियुक्ती निश्चित झाल्याने सिरसाट यांचे स्वप्न पुन्हा एकदा धुळीस मिळाले आहे. पालकमंत्रिपदी नियुक्तीनंतर अब्दुल सत्तार यांच्या सिल्लोड मतदारसंघात शिवसेना कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. एकमेकांना लाडू-पेढा भरवून कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा करत एकमेकांना शुभेच्छा दिल्या. पैठणचे शिवसेनेचे आमदार संदिपान भुमरे यांनी एकनाथ शिंदे यांना साथ देत बंड केले. शिंदे सरकार स्थापन झाल्यावर त्यांना रोहयो मंत्रिपदासह पालकमंत्री पद देखील मिळाले. अनेक वर्षांनी जिल्ह्याला स्थानिक मंत्री या पदावर मिळाला असल्याने विकासाला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. मात्र झालेल्या लोकसभा निवडणुकीत संदिपान भुमरे लोकसभा निवडणूक जिंकले. त्यामुळे त्यांच्या जागी कोण असा प्रश्न निर्माण झाला. त्याचवेळी भाजपा आमदार आणि राज्याचे मंत्री अतुल सावे यांना हा मान द्यावा, अशी मागणी भाजपातर्फे करण्यात आली. जून महिन्यात लोकसभेचे निकाल लागल्यावर अल्पसंख्याक मंत्री अब्दुल सत्तार यांनी केलेल्या काही विधानांमुळे ते पुन्हा काँग्रेसमध्ये जातील, अशी चर्चा सुरू झाली. त्यात आपला एकनाथ शिंदे यांच्याशी प्रासंगिक करार असल्याचे त्यांनी सांगितल्याने ते नाराज आहेत का? असे वाटत होते. मात्र अब्दुल सत्तार यांच्या या खेळीने पालकमंत्रिपद त्यांच्या पदरात पडले असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. मात्र यामुळे आ.सिरसाठ नाराज होण्याची शक्यता आहे.

----------

### खनिजांवर गोळा केलेली

डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती डीवाय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील नऊ न्यायाधीशांच्या खंडपीठात न्यायमूर्ती हृषिकेश रॉय, न्यायमूर्ती अभय एस ओका, न्यायमूर्ती बीव्ही नागरथना, न्यायमूर्ती जेबी पार्डीवाला, न्यायमूर्ती मनोज मिश्रा, न्यायमूर्ती उज्ज्वल भुईया, न्यायमूर्ती सतीश चंद्र शर्मा आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांचा समावेश होता. सुनावणीदरम्यान सर्वोच्च न्यायालयाने म्हटले होते की, राज्यघटनेत खनिज अधिकारांवर कर लावण्याचा अधिकार केवळ संसदेलाच नाही तर राज्यांनाही देण्यात आला आहे. त्याच वेळी, केंद्रातर्फे उपस्थित असलेले ॲटर्नी जनरल आर वेंकटरामानी यांनी असा युक्तिवाद केला होता की खाणी आणि खनिजांवर कर लादण्याबाबत केंद्राला सर्वोच्च अधिकार आहेत. नऊ न्यायाधीशांच्या घटनापीठाने अतिशय गुंतागुंतीच्या प्रश्नावर विचार केला होता. यानुसार, केंद्र खाण लीजवर रॉयल्टी वसूल करू शकते, जी कर म्हणून गणली जाईल. हाच निर्णय १९८९ मध्ये सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने दिला होता. या प्रकरणाची मुळे इंडिया सिमेंट्स लिमिटेड आणि तामिळनाडू सरकार यांच्यातील वादात होता. इंडिया सिमेंटने तामिळनाडूमधील खाण लीज घेतली आणि राज्य सरकारला रॉयल्टी भरत होती. नंतर राज्य सरकारने इंडिया सिमेंटवर रॉयल्टीव्यतिरिक्त आणखी एक उपकर लावला. यानंतर इंडिया सिमेंटने मद्रास उच्च न्यायालयात धाव घेतली होती. जिथे त्यांनी असा युक्तिवाद केला की रॉयल्टीवरील उपकर म्हणजे रॉयल्टीवरील कर जो राज्य विधानसभेच्या कक्षेबाहेर आहे. नंतर १९८९ मध्ये, इंडिया सिमेंट्स लिमिटेड विरुद्ध तामिळनाडू राज्य सरकार या खटल्यात सर्वोच्च न्यायालयाच्या सात न्यायाधीशांच्या खंडपीठाने रॉयल्टी हा कर असल्याचे मत मांडले होते.

दैनिक
राज्य
लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
३
शुक्रवार दि. २६ जुलै २०२४

## २४७ होमगार्ड भरतीसाठी अर्ज करण्याचे अप्पर पोलीस अधीक्षक पांडकर यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा होमगार्ड मधील रिक्त असलेल्या २४७ होमगार्ड पुरुष आणि महिला अनुशेष भरती करण्यासाठी होमगार्ड नोंदणीचे आयोजन दिनांक २२ ऑगस्ट २०२४ पासून पोलीस मुख्यालय बीड येथे करण्यात आले आहे. याकरिता दिनांक २६ जुलै ते दिनांक १६ ऑगस्ट २०२४ अखेर ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. होमगार्ड नोंदणीची माहिती पत्रक, नियम व अटी बाबत विस्तृत माहिती https:/ maharashtracdhg.gov.in./mahahg/login1.php या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निवड होऊन पात्र ठरलेले उमेदवार हे वेतनी सेवेत असतील तर त्यांना त्यांनी वेतनी सेवेत असल्यास कार्यालयाचे अथवा मालकांचे नाहरकत प्रमाणपत्र, पोलीस चरित्र पडताळणी अहवाल व सक्षम अधिकाऱ्यांची शारीरिकदृष्ट्या सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, माजी सैनिक अथवा एनसीसी प्रमाणपत्रधारक व इतरांना सर्व संबंधित प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवारास नोंदणीच्या वेळी त्यांना सुखाचा नाही यावे लागेल सदर अनुशेषमध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हा समादेशक होमगार्ड यांना राहील. होमगार्डमध्ये सेवा करण्यासाठी इच्छुक असलेल्या जिल्ह्यातील रहिवासी उमेदवारांनी नोंदणी करता अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा समादेशक तथा अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी केले आहे.

# शिवसैनिक भाजपला त्यांची जागा दाखविल्या शिवाय राहणार नाही -शिवाजीराव चोथे

**मंठा । प्रतिनिधी**

भाजपा हा पाठीत खंजीर खुपसणारा पक्ष आहे, २०१४ मध्ये भाजपने युती तोडली. भाजपचे अनेक लोक शिवसेनेच्या जीवावर मोठे झाले, आता या निवडणुकीत परतुर मतदारसंघातील शिवसैनिक भाजपला त्यांची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास माजी आमदार तथा परभणी लोकसभा समन्वयक शिवाजीराव चोथे यांनी व्यक्त केला. मंठा येथील सरस्वती मंगल कार्यालयात गुरुवार ता. २५ रोजी आयोजित शिवसेना सदस्य नोंदणी आरंभ व बूथप्रमुख, पदाधिकारी बैठकीत श्री चोथे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बुलढाणा जिल्ह्याचे शिवसेना संघटक प्रा.डॉ. गोपाल बच्छीरे, मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन, जिल्हाप्रमुख ए जे बोराडे, उपजिल्हाप्रमुख माधवराव कदम, ज्येष्ठनेते अंकुशराव अवचार, परतुर तालुकाप्रमुख सुदर्शन सोळंके, मंठा तालुकाप्रमुख अजय अवचार,विधानसभा समन्वयक अशोक आघाव, युवा सेना जिल्हा समन्वयक महेश नळगे, बेबीताई पावसे, बालासाहेब बोराडे, जे. के.कुरेशी, शहरप्रमुख वैजनाथ बोराडे, सुभाषराव घारे यांची उपस्थिती होती. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना श्री चोथे म्हणाले की, परतुर विधानसभा मतदारसंघ शिवसेनेला सुटावा अशी मागणी करण्यात आली असून पक्षाचे निष्ठेने कार्य करणारे जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा असे सांगून त्यांनी उपप्रमुखांकडून गाव निहाय आढावा घेतला. प्रा.डॉ. गोपाल बच्छीरे गद्दारांनी पक्ष चोरला चिन्ह चोरले झेंडे बदलले नेते बदलले मात्र निष्ठावंत शिवसैनिक पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पाठीशी उभी राहिली. या सरकारच्या लाडकी बहीण लाडक्या भाऊ या योजना फसव्या आहेत त्यांना त्यांची जागा वेळीच दाखवून




देण्याची ही वेळ आली आहे. भाजपा पूर्णपणे जातीवादी पक्ष असून सत्तेसाठी ते कोणत्या थराला जाऊ शकतात हे त्यांनी महाराष्ट्राला दाखवून दिले. आगामी विधानसभा निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी बूथप्रमुखांनी संपूर्ण मतदार यादीवर आतापासून लक्ष केंद्रित करावे असे आवाहन केले. मराठवाडा सचिव अशोक पटवर्धन यांनी विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी सर्वांनी तयारीला लागा असे आवाहन केले. यावेळी जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे प्रास्ताविक करताना म्हणाले की, परतुर मतदारसंघाने लोकसभा निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवाराला मताधिक्य देण्याची परंपरा आजपर्यंत जोपासली, या मतदारसंघात ३०-३५ वर्षापासून शिवसेनेचे प्रचंड जाळे निर्माण झाले आहे. गावागावात तांड्या तांड्यात वस्ती वाडीवर जाऊन शिवसैनिकांनी प्रचंड मेहनत घेतलेली आहे. हा मतदारसंघ शिवसेनेला सुटला तर मराठवाड्यात सर्वाधिक मताधिक्याने निवडून येणारी ही जागा असेल अशी ग्वाही दिली. या निवडणुकीत भाजपची हुकुमशाही, सत्ता आणि पैशाचा माज उतरविण्यासाठी शिवसैनिकांनी काम करावे, भाजपला या मतदारसंघातून हद्दपार करण्याच्या तयारीला लागा असे आवाहन त्यांनी केले. जास्तीत जास्त शिवसेना सदस्य नोंदणी करण्याबाबत त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला माजी सभापती संतोष वरकड बाबाराव राठोड सुरेश सरोदे माऊली सरकटे, संजय नागरे,मधुकर काकडे डॉक्टर दत्तात्रय काकडे, डॉ. संतोष पवार, ड.ज्ञानेश्वर जाधव, अरुण उफाड, केशव महाराज सरकटे, दत्ता पा. सुरुंग, तुळशीराम कोहिरें, वसंतराव राऊत, दासू खरात, बबन शेळके, पांडू वैद्य, विष्णुपंत खराबे, आसाराम बोराडे, संतोष वरकड, डॉ. उद्धव उबाळे, रयांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, बुथप्रमुख यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पप्पू दायमा यांनी केले चौकट मतदारसंघातील भाजपची मस्ती उतरवा -- ए.जे. बोराडे.... परतुर मतदारसंघात शिवसेनेची मोठी ताकद आहे, भाजपची हुकूमशाही, मस्ती, सत्ता आणि पैशाचा माज उतरविण्याची वेळ आहे. या निवडणुकीत शिवसैनिकांनी प्रचंड ताकदीने कामाला लागावे असे सांगून या मतदारसंघात ५० हजार शिवसेना सदस्य नोंदणी करण्याचे आवाहन जिल्हाप्रमुख ए.जे. बोराडे यांनी केले.

## अंबाजोगाई बसस्थानकाची दुरावस्था संपेना

### प्रवाशांचा एक पाय चिखलात तर दुसरा खड्डयात

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

केवळ मराठवाड्यातच नव्हे तर राज्यात नावाजलेल्या अंबाजोगाई बसस्थानकाची दुरावस्था संपता संपेना अलीकडेच झालेल्या पावसामुळे बसस्थानकात खड्डे व चिखल यांचे साम्राज्य निर्माण झाले असल्याने प्रवाशांचा एक पाय चिखलात तर दुसरा खड्डयात अशी अवस्था झाली असून बसस्थानकातील रस्त्यांची ही दुरावस्था कधी थांबणार असा सवाल प्रवाशांतून होत आहे.




गेल्याच महिन्यात अंबाजोगाई आगाराने अधिक कमाई करून राज्यात नाव मिळविले आहे. त्याच प्रमाणे अंबाजोगाई आगार व बसस्थाक मराठवाड्यातच नव्हे तर राज्यात उत्तम बसस्थानक म्हणून अशी ओळख आहे. मात्र अलिकडे झालेल्या पावसामुळे अंबाजोगाई बसस्थानकाची दुरावस्था झाली आहे. बसस्थानक परिसरातील खड्डयांमध्ये पावसाचे पाणी व चिखल यांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. अंबाजोगाई बसस्थानकात विविध जिल्ह्यात दररोज विविध प्रवाशी मोठ्या संख्येने येत असतात. या बसस्थानकात प्रवाशांचे नेहमी वर्दळ मोठ्या प्रमाणात दिसून येते. परिणामी या दुरावस्थेला तोंड देत प्रवाशांना सामोरे जावे लागत आहे. प्रवाशांच्या दृष्टीने ही एक गंभीर समस्या असून या समस्येकडे अंबाजोगाई आगाराने लक्ष देवून अंबाजोगाई बसस्थानक स्वच्छ व सुंदर करावे अशी मागणी प्रवाशी वर्गाने केली आहे.

## अंबाजोगाई शहर हे पुस्तकांचे गाव म्हणून जाहीर करावे -राजकिशोर मोदी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई शहर हे पुस्तकांचे गाव जाहीर करण्यात यावे अशी मागणी अंबाजोगाई शहराचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी बुधवार दि २४ रोजी महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री मा. ना. दिपक केसरकर यांची मुंबई येथे भेट घेऊन मागणीपर निवेदन सादर केले. याप्रसंगी मंत्री दीपक केसरकर यांनी देखील राजकिशोर मोदी यांनी केलेल्या मागणीवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले.



अंबाजोगाई शहर हे प्राचीन काळापासून शैक्षणिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक वारसा लाभलेले शहर म्हणून त्याची ओळख सर्वदूर आहे. त्याचबरोबर मराठी भाषेची जननी म्हणून देखील अंबाजोगाई शहराची ओळख आहे. याच अंबाजोगाई शहरातच मराठीचे आद्यकवी स्वामी मुकुंदराज मराठी भाषेतील सर्वात पहिला असा विवेकसिंधु या ग्रंथाचे लेखन केले. रामदास स्वामी यांनी रचलेली पासोडी देखील अंबाजोगाई शहरातच आहे. या पासोडीला देशाचे पहिले राष्ट्रपती डॉ राजेंद्रप्रसाद यांनी स्वतः भेट दिली होती. या भेटीत डॉ राजेंद्रप्रसाद यांनी या पासोडीचा गौरव करण्यात आला होता. गौरविण्यात आलेली ४० फूट लांब व ४ फूट रुंद असलेल्या पासोडीचें जतनही अंबाजोगाई शहरातच केले गेले आहे. यामुळेच अंबाजोगाई शहराला एक वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

याच ठिकाणी मराठी व हिंदी भाषेत अनेक पुस्तके लिहिली आहेत. अंबाजोगाई शहर सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक व पर्यटन दृष्ट्या सक्षम असून लेखक साहित्यिक व वाचनप्रेमींचा या शहरास भेटणारा वर्गदेखील मोठ्या प्रमाणात आहे. अशी सर्व अंबाजोगाई शहराची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता अंबाजोगाई शहर पुस्तकांचे गाव जाहीर करण्यात यावे अशा विनंतीचे पत्र मुंबई येथे राज्याचे शालेय शिक्षण व मराठी भाषा मंत्री मा.ना दीपक केसरकर यांना भेटून दिले.

पान ६ वरून...

### जालन्यात विना नंबरच्या

येत आहे. काल रोजीपासुन शहर वाहतुक शाखा कडुन चालु करण्यात आलेल्या मोहिमे अंतर्गत जालना शहरात बाहेर जिल्हयाचे पासींग असलेले विना परमीट चे तसेच विना कागदपत्र, विना नंवर चालणारे एकुण ४० अँटो रिक्षा वाहणावर कार्यवाही करण्यात आली असुन सदर मोहिम हि नियमीत पणे चालु राहणार आहे. सदरील कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक साहेब, मा.अपर पोलीस अधिक्षक साहेब जालना, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब जालना यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक जी. एस. शिंदे, आणि वाहतुक शाखेचे पोलीस अंमलदार यांनी पार पाडली.

### मतदारसंघाच्या विकासासाठी

केली. तिन कोटी रूपये खर्चातुन घनकचरा व्यवस्थापनाकरीता घनकचरा प्रक्रिया केंद्र उभारले. वीस कोटी रूपये खर्चातुन उपजिल्हा रूग्णालयाची उभारणी होत आहे. २८ कोटी रूपयांतुन ट्रामाकेअर आणि कर्मचारी निवासस्थाने, पन्नास कोटी रूपये खर्चातुन स्त्री रूग्णालय, दहा कोटी रूपये खर्चातुन क्रिडा संकुल, औद्योगिक वसाहतीमध्ये उद्योग धंद्यांना चालना, बसस्थानकात २५ कोटी रूपये खर्चातुन १२५ व्यापारी दुकाने व अद्यावत सिनेमागृह सुरू होणार आहे. तसेच नविन बसस्थानक येथे छत्रपती शिवाजी महाराज व जुने बसस्थानक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने नपला जागा हस्तांतरीत करण्यात आली यासह विवीध विकास कामे मार्गी लावण्यात आले असल्याची माहिती आमदार प्रकाश सोळंके यांनी दिली आहे.

### ओबीसी आरक्षण वाचविण्यास

आप्पासाहेब बडे, संजय राठोड, उमेश गायकवाड, आप्पा आढाव, दिनेश आवाड, विराट मुंडे, नारायण डोरले , प्रमेश्वर बडे, बंडू राठोड, नवनाथ आडे यांच्या सह परिसरातील हजारोंच्या संख्येने ओबीसी बांधवाची उपस्थिती होती.ओबीसी योध्दे प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांचा ८५ वर्षाचे वयोवृद्ध आजोबा श्रीरंग बडे यांनी सत्कार केला. मात्र यावेळी प्रा.हाकेंनी आजोबाचाच सत्कार करून आम्ही देत असलेल्या ओबीसी आरक्षण बचाव लढ्याला आपल्या ज्येष्ठांच्या आर्शिवादामुळे शंभर हत्तीचे बळ मिळत असल्याचे समाधान बोलताना व्यक्त केले.

### लोकमान्य लोकनेत्या

होत असं नाही पण पंकजाताई मात्र याला अपवाद आहेत. मुंडे साहेबांचा वारसा होणं म्हणजे त्यांच्या सत्ता, संपतीचा वारसा होणं नाही, तर त्यांच्या आदर्श विचारांचा..वंचित, पिडित, शोषित, दीनदुबळ्यांची सेवा करण्याचा.. आणि त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा वारसा चालवणं..जे काम पंकजाताई आपल्या राजकीय जीवनात अव्याहतपणे करत आल्या आहेत. सामाजिक बांधिलकी जोपासताना 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही ' हे त्यांनी केवळ बोलून नव्हे तर आपल्या कृतीतून दाखवून दिले आहे. पद, सत्ता असो वा नसो मुंडे साहेबांचा माणसं जोडण्याचा सक्षम वारसा त्यांनी कायम जपला. आपल्या कामांतून त्यांनी वंचित, उपेक्षित घटकांची सेवा करून त्यांचे आशीर्वाद घेतले. समाजातील जातीभेद झूगारून एक माणूस म्हणून विविध घटकांना आपुलकीने जोडण्याचे काम त्या करत आहेत. सामान्य माणसासाठी अहोरात्र काम करण्याच्या स्वभावामुळे आलेल्या प्रत्येक संकटावर मात करत लोकनेत्याचा खरा वारसा त्या आज पुढे नेत आहेत. लोकांना त्यांच्या रूपात मुंडे साहेबच दिसतात, त्यांच्यावर येणारा प्रत्येक वार स्वतःच्या अंगावर घेण्यासाठी कार्यकर्ते सदैव तयार असतात. 'गोपीनाथ मुंडे हे नांव जगाला विसरू देणार नाही', अशी शपथ घेणारे त्यांचे स्वाभिमानी नेतृत्व संघर्षाच्या अग्निदिव्यातून बाहेर पडून पुन्हा तितक्याच रूबाबात आणि आत्मविश्वासाने वाटचाल करेल, यात तीळमात्र शंका नाही. परमेश्वर त्यांना उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य प्रदान करो, त्यांच्या हातून जनसामान्यांची सेवा सतत होत राहो..याच आजच्या वाढदिवशी मनःपूर्वक शुभेच्छा..!

प्रदीप कुलकर्णी

### धारूर तालुक्यात अतिवृष्टी

मोठे नुकसान झाले आहे पाण्याखाली पिके गेल्यामुळे उत्पन्नामध्ये मोठी घट होणार आहे किंवा दुबार पेरणीचे ही संकट येऊ शकते अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे महसूल प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी अशी मागणी शेतकरी करत आहेत.

### मराठवाड्यात शेकाप

मराठवाड्यात शेतकरी कामगार पक्षाचा पुन्हा एक झंझावात उभा करू पंढरपूर येथे मोठ्या संख्येने सहभागी होऊ व बैठकीच्या अध्यक्षस्थानी भाई विष्णूपंत घोलप होते. यावेळी प्रत्येक जिल्ह्यातील प्रतिनिधीनी पंढरपूर येथील अधिवेशनासाठी मराठवाडयातील मोठ्या संख्येने पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित राहणार असल्याचे सर्वांनी सांगितले.तसेच सर्वांनी पक्षवाढी मत व्यक्त केले.यावेळी मध्यवर्ती कमिटी सदस्य भाई मनोज पाटील,भाई बाळासाहेब धस,किरण खपले,भाई उदय गवारे,विजय उत्तमराव,अभी लोंढे गोविद डुमणे,राजुसरनर,भाई सुशील सोमवंशी,राजेंद्र नवले,दत्ता सोमवंशी शिवाजी सुरवसे,शिवाजी पोळ,राजाराम रसाळ,मुख्तार पठाण,चंद्रकांत सरवदे,गणपत कोळपे आभार ड.गोले पाटील यांनी मानले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी ड.निखिल बचुटे,आवेज सय्यद अशोक रोडे यांनी परिश्रम घेतले.या वेळी मराठवाड्यातील पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष माजलगाव विधानसभा लढणार -ॲड.कॉ.सय्यद याकूब

**माजलगाव । प्रतिनिधी**

आगामी होणाऱ्या निवडणूकीत माजलगाव विधानसभा निवडणूक लढवण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हा समीतीने राज्याकडे पाठवला आहे. माजलगाव मतदार संघात अनेक वर्षांपासून कम्युनिस्ट चळवळीची परंपरा आहे मतदारसंघात पक्षाच्या असंख्य शाखा सक्रीय कार्यरत असून पक्ष सतत शेतकरी, कामगार,शेतमजूर, विद्यार्थी,युवक व जनतेच्या प्रश्नांवर व तसेच राज्य व केंद्र सरकारच्या जनते विरोधी धोरणांच्या विरोधात संघर्ष करत आहे.या मतदार संघात पक्षाच्या तरुण कार्यक्रत्यांची फौज आहे.यापुर्वी पक्षाने सन २००४ ची विधानसभेची निवडणूक



लढवलेली असून तेव्हापासून पक्ष सातत्याने जातीयवादी पक्षाचा पराभव करता यावा म्हणून धर्मनिरपेक्ष पक्षाला आपला पाठींबा दिलेला आहे.परंतू आता २०२४ ची विधानसभा निवडणूक पक्षाने लढवण्याचा निर्णय घेतला आहे अशी माहीती पक्षाचे जिल्हा सदस्य ऑड. कॉ.सय्यद याकुब यांनी एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहीती दिली आहे

## इनरव्हिल क्लबचा पदग्रहण समारंभाचे आयोजन सुरेखा सिरसट यांनी स्विकारला अध्यक्षपदाचा पदभार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील इनरव्हिल क्लबचा पदग्रहण समारंभाचे आयोजन शनिवार, दिनांक २० जूलै २०२४ रोजी करण्यात आले होते. या समारंभात वर्ष २०२४ -२५ साठी अध्यक्षपदाची सूत्रे सुरेखा सिरसट यांनी स्विकारली.

कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी अंबानगरीच्या पहिल्या महिला मुख्याधिकारी प्रिंयका टोंगे व क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनिता मोदी यांच्या उपस्थितीत इनरव्हिल क्लबच्या मावळत्या अध्यक्षा सुनिता कात्रेला यांनी सुरेखा सिरसट यांना अध्यक्षपदाची सूत्रे प्रदान केली. माजी अध्यक्षांनी वर्षभर राबविलेल्या




कार्याचा आढावा घेतला. तर नवीन अध्यक्षांनी या वर्षीच्या थीमनुसार व डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ.शोभना पालेकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रीयांचे शारीरिक व मानसिक आरोग्य, ग्रिन मॅरेथॉन, महिलांची तपासणी - गर्भाशयाचा कर्करोग व लसीकरण, डोळ्यांचे ऑपरेशन व चष्मा वाटप, जेष्ठ नागरिकांसाठी उपक्रम, पिंक अंबाजोगाई उपक्रम -क्ह ची मुलींची तपासणी व कमी असेल अशा मुलींना इनरव्हिलच्या सर्व मेंबर्स त्या मुलींना दत्तक घेऊन तिचा क्ह वाढवण्यासाठी तिला गोळ्या, औषध गुळ -शेंगदाणे लाडू असे पौष्टिक आहार देवून एक चांगली पिढी घडविण्यासाठी प्रयत्नशील, शेळ्या वाटप असे अनेक उपक्रम राबवू असे सांगितले. विशेष सत्कार अशोक केदार सरांचा केला. त्यांचा परिचय रेखा तळणीकर यांनी केला. सुत्रसंचलन कोमल कात्रेला , आभार चंद्रकला देशमुख यांनी मानले. कार्यकारिणी पुढीलप्रमाणे - सचिव -संगीता नावंदर, सहसचिव -सुरेखा कचरे, ट्रेझरर- कल्पना शिंदे, आय.एस.ओ- जयश्री कराड , एडिटर - रेखा शितोळे, सी.सी.- अंजली चरखा यांनी पदभार स्विकारला. कार्यक्रमाला रोटरीचे अध्यक्ष कल्याण काळे, रोटरीचे सचिव धनराज सोलंकी, रोटरॅक्टचे अध्यक्ष जतिन कर्नावट, रोटरॅक्टचे उपाध्यक्ष मयुर परदेशी ,रो.जगदीश जाजू डॉ .प्रतिक सिरसट, नावंदर भैय्या,डॉ.प्रज्ञा इंगोले, डॉ.प्रगती मुंडे, सरीता रापतवार व मेंबर्स गवळण केंद्रे, लीना लहाने, जयश्री लव्हारे, अणिता सुराणा, सरीता जाजू, रजनी माने, अणिता फड, केदारताई, किरण केंद्रे, प्रिया तिडके, पुजा होळंबे , सुलोचना मलवाड आदींसह उपस्थित होते.

## 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजने' अंतर्गत जिल्ह्यातील युवकांना शासकीय निमशासकीय तसेच खासगी कार्यालयात रोजगारची संधी

**बीड । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण या नावीन्यपूर्ण योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील युवकांना शासकीय निमशासकीय तसेच खाजगी कार्यालयात रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. ही योजना महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष यांच्यामार्फत संयुक्तपणे राबवली जाणार आहे.

जिल्ह्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाची प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळविण्याची क्षमता वाढविण्यासाठी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना वर्ष २०२४ २५ या आर्थिक वर्षापासून सुरू करण्याची मान्यता देण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत तयार केलेल्या. https:// rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातून रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करून देणारे उद्योजक जोडले जातील रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातून मिळून त्यांची क्षमता वाढ होईल तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ कार्य प्रशिक्षण योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल यासाठी इच्छुक उमेदवार आणि प्रशिक्षण देऊ इच्छिणारे उद्योजक विभागाचे संकेतस्थळावर नोंदणी करावी. या योजनेअंतर्गत



खाजगी क्षेत्रातील आस्थापना/ उद्योजकांकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या १० % टक्के व सेवा क्षेत्रासाठी २०% उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय निमशासकीय या आस्थापना उद्योग महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या ५ % टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. मात्र आस्थापना उद्योग यांनी त्यांच्याकडील कार्यरत मनुष्यबळाची माहिती अचूक दर्शविणे आवश्यक आहे. तसे न केल्यास प्राधिकृत अधिकारी हे शिक्षेस पात्र राहतील. २० रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्य प्रशिक्षणासाठी सहभागी होण्यासाठी पात्र राहतील.

शैक्षणिक अरतेनुसार दिले जाईल विद्यावेतन

प्रशिक्षण योजनेअंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अहरतेप्रमाणे शासनामार्फत विद्या वेतन दिले जाईल. अंतर्गत बारावी पास प्रशिक्षणार्थींना ६०००/- रुपये प्रतिमाह, आयटीआय पदविका अशा प्रशिक्षणार्थींना ८०००/- रुपये प्रतिमाह दिला जाईल. पदवीधर आणि पदव्युत्तर प्रशिक्षणार्थींना १०,०००/- रुपये महिना प्रतिमाह दिला जाईल.

बीड जिल्ह्यातील इच्छुक उमेदवार यांनी उद्योजक विभागाचे संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र बीड सुनील उचले यांच्याकडून करण्यात आले आहे.

## ॲड.शेख शफीक यांनी बांधकाम कामगार बीड कार्यालयास दिली भेट



**बीड । प्रतिनिधी**

बीड बांधकाम कामगार अधिकारी चव्हाण साहेब यांची भेट घेतली व मुख्य अधिकारी मुंडे साहेबांशी दुरध्वनी चर्चा केली व भाऊनी बांधकाम कामगार चे होत असलेली हेळसांड थांबवा, वेळे वर बांधकाम कामगार चे प्रश्न मार्गी लावा, वेळे वर बांधकाम कामगार ला योजनेचे लाभ मिळावा, यासाठी कार्यालय मध्ये स्टाफ वाढवावा. अशा विविध मागणीसाठी निवेदन देण्यात आले . ही मागण्या मान्य झाल्या नाही तर चखच् लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल. असा इशारा देण्यात आला,कर्तव्यदक्ष बांधकाम शहराध्यक्ष सय्यदुबासेद यांच्या विंनती वरुन भाऊंनी बांधकाम कामगार कार्यालय भेट दिली.

यावेळी युवक जिल्हाध्यक्ष शेख मतीन, शहराध्यक्ष शिवाजी भोसकर, जेष्ठ नेते सलाम सेठ, जिल्हा समन्वयक सय्यद सैफअली लालु,शहर उपाध्यक्ष शेख शाकेर, तालुका उपाध्यक्ष साजन चौधरी , युवक शहराध्यक्ष शेख सलमान,सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष सोहेल शिकलगार,वार्ड अध्यक्ष शेख नेहाल, हबीब भाई आदी बांधकाम कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेती प्रश्नांवर लोकसभेत खडाजंगी महाराष्ट्रातील खासदार आक्रमक

**नवी दिल्ली: राज्यात पावसाने धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. तर देशाच्या राजधानी दिल्लीत मात्र शेतकरी प्रश्नांवरून माहोल गरमागरम झाला आहे. संयुक्त किसान मोर्चा राजकीयच्या नेत्यांनी काँग्रेस नेते आणि लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची बुधवारी (ता.२४) भेट घेतली. या भेटीत राहुल गांधींनी शेतकरी नेत्यांना संसदेत हमीभाव मुद्द्यावर पर्सनल बिल आणून चर्चा घडवू, असे आश्वासन दिले. त्यात अर्थसंकल्पात बिहार आणि आंध्रप्रदेशला झुकतं माप देऊन इतर राज्यांच्या तोंडाला पाने पुसल्याची टीका करत इंडिया आघाडीनं जोर धरला. अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी विरोधकांच्या या टीकेला आक्रमक उत्तर दिलं. महाराष्ट्राचा अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख केला नाही, पण अर्थसंकल्पातील विकास कामांसाठी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे, असे अर्थमंत्री सितारामन म्हणाल्या.**

केंद्रिय अर्थसंकल्प सादर केल्यानंतर अर्थसंकल्पात महाराष्ट्र, पश्चिम बंगाल या राज्यांसाठी तरतूद प्रस्तावित करण्यात आला नाही, अशी विरोधकांनी आरोप केला होता. त्यामुळं अर्थमंत्री भडकल्या. त्यांनी काँग्रेस सत्तेत असताना अर्थसंकल्पात प्रत्येक राज्याचा उल्लेख केला जात होता का? असा प्रश्न उपस्थित केला. त्यावर काँग्रेसकडून पलटवार करण्यात आला. त्यामुळं संसदेत माहोल गरम झाल्याचं पाहायला मिळालं. त्यात महाराष्ट्रातील सोलापूरच्या खासदार प्रणिती शिंदे आणि बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी शेतकरी मुद्द्यांवरून सरकारवर निशाणा साधला. तर सांगलीचे खासदार विशाल पाटील यांनी सांगली-कोल्हापूर पुराचा मुद्दा उपस्थित केला. त्यामुळं बुधवारी संसदेत खासदार शिंदे, सुळे आणि पाटील यांनी सरकारवर प्रश्नांचा भडिमार केला. प्रणिती शिंदे यांनी शेतकरी सन्मान निधी, पीकविमा आणि शेती निविष्ठावरील जीएसटीचा मुद्दा मांडला. शेतकऱ्यांना ६ हजार देऊन खत आणि बियाण्यावर १८ टक्के जीसटी आकरली जाते, असं शिंदे म्हणाल्या. पुढे शिंदे म्हणाल्या, सांगली, सोलापूर, सातारा जिल्ह्यातील शेतकरी पीक विम्यासाठी



अर्ज करतात. पण त्यांना तूर आणि उडीद पिकासाठी पीकविमा दिला जात नसल्याचं शिंदे यांनी मुद्दा उपस्थित केला. दुसरीकडे खासदार सुप्रिया सुळे यांनी केंद्र सरकारवर शेतमाल निर्यातीवरून टीका केली. महाराष्ट्रातल्या कांदापट्ट्यात एनडीएला दोन जागा गमवाव्या लागल्या तरीही कांदाप्रश्नात सरकारने अजूनही लक्ष घातलेलं नाही, असं सुळे म्हणाल्या. त्यांनी दूध प्रश्नावरून आक्रमक पवित्रा घेतला होता. शेतीचा प्रश्न गंभीर झाला आहे, पण केंद्र सरकारचं लक्ष शेतीच्या प्रश्नाकडे नाही, असा सुळे यांनी आरोप केला. त्यावरून गुरुवारी मात्र अर्थमंत्री आक्रमक झाल्या. केंद्र सरकारने राबवलेल्या योजना महाराष्ट्रासाठीही असल्याचं सांगत विरोधकांवर टीकाही केली. दुसरीकडे सांगलीचे खासदार यांनी महापुरानं २००५, २०१९ आणि २०२१ मध्ये नुकसान झाल्याचे दाखले दिले. तसेच आजही तीच स्थिती असल्याचं सांगत कोयना आणि कर्नाटकमधील अलमट्टी धरणांची ऊंची वाढवण्याकडे लक्ष वेधले. त्यात गुरुवारी (ता.२५) शेतकरी आंदोलनावरून काँग्रेसचे खासदार चरणजीतसिंह चन्नी यांनी घणाघाती टीका केली. हमीभावाची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांना हरियाणा आणि पंजाबच्या सीमेवर अडकवून ठेवले जाते, ही आणीबाणी नाही तर काय आहे? असा प्रश्न उपस्थित करत चन्नी यांनी सरकारवर टीका केली. खरे म्हणजे गेल्यावर्षीच्या दुष्काळनं शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिसकावून घेतला. त्यात केंद्र सरकारच्या शेतमाल निर्यात बंदीच्या धोरणांनी शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले. आर्थिक पाहणी अहवालातील आकडेवारीनुसार गेल्यावर्षी कृषी क्षेत्राचा विकास दर १.४ राहिला. गेल्या सहा वर्षातील नीचांकी कामगिरी असल्याचं त्यावरून स्पष्ट होत आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राची पिछेहाट सरकारनेच मान्य केलीय. मात्र तरीही अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रातील संरचनात्मक सुधारणांना हात घातला गेला नाही. त्यात आता विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी हमीभाव कायद्याच्या मुद्द्यावर चर्चा घडवून आणण्याचं आश्वासन दिले आहे. त्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनात शेतकऱ्यांचे मुद्दे चर्चेला येतील, असे चित्र आहे.

# कोंबड्यांच्या खाद्यात कोणते घटक असावेत?



पोल्ट्री उद्योगात कोंबड्यांचे खाद्य नियोजन ही सर्वात महत्वाची बाब आहे. एकूण खर्चापैकी ६० ते ७० टक्के खर्च कोंबड्यांच्या खाद्यावरच होत असतो. सकस,पौष्टिक आणि संतुलित खाद्य मिळाले तरच मांस किंवा अंडी वजनदार मिळतात, कोंबड्यांची मरतूक कमी होते. पक्षांना खाद्य देतांना त्याचे पिल्ले ,ब्रॉयलर आणि लेअर अंडी देणाऱ्या अशा तीन प्रकारात खाद्य नियोजन स्वतंत्र करावे लागते. एकूण खाद्यापैकी फक्त ३५ ते ४५ टक्के खाद्याचे रूपांतर मांस किंवा अंड्यात होत असते.

अंडे देणाऱ्या कोंबड्यांची कमीत कमी ओलावा असलेले ताजे खाद्य द्यावे. त्यात प्रोटीन, कार्बोहायड्रेट, चरबी, खनिज पदार्थ, व्हिटॅमिन्स यांचे संतुलन असणे गरजेचे आहे. पक्ष्यांच्या वाढीसाठी, शरीराची झीज भरून काढण्यासाठी, रोगप्रतिकारशक्ती निर्माण करण्यासाठी प्रथिनांची गरज असते. कडधान्यांमध्ये सुमारे आठ ते बारा टक्के आणि द्विदल धान्यांमध्ये तीस ते चाळीस टक्के प्रथिने असतात. कोंबडीखाद्यामध्ये वनस्पतिजन्य प्रथिने आणि प्राणिजन्य प्रथिनांचा समावेश करावा. मका ,गहू ,तांदूळ ,ज्वारी ,बाजरी असे पिष्टमय पदार्थ सोयाबीन सारखे चरबीयुक्त पदार्थ आणि व्हिटॅमिन्स ,खनिजद्रव्ये असावी लागतात. ज्वारी, गहू, मका, तांदूळ इ. धान्यांत पिष्टमय पदार्थ भरपूर असतात. हे घटक आहारात असावेत. पक्ष्यांच्या वाढीसाठी स्निग्ध पदार्थांची आवश्यकता असते. हे पदार्थ अन्न तुटवड्याच्या कालावधीमध्ये शरीरास उष्णता व कार्यशक्ती पुरवितात. स्निग्ध पदार्थांमुळे खाद्याला चांगली चव येते. सर्व प्रकारचे खाद्यतेल व चरबी यांपासून स्निग्ध पदार्थ मिळतात. पक्ष्यांच्या वाढीसाठी स्निग्ध पदार्थांची आवश्यकता असते. हे पदार्थ अन्न तुटवड्याच्या कालावधीमध्ये शरीरास उष्णता व कार्यशक्ती पुरवितात. स्निग्ध पदार्थांमुळे खाद्याला चांगली चव येते. सर्व प्रकारचे खाद्यतेल व चरबी यांपासून स्निग्ध पदार्थ मिळतात. धान्य भरडून घेऊन घरीच आपल्या हाताने/स्वात:च्या निगराणीत खाद्य तयार करणे परवडणारे आणि आरोग्यदायी असते. अंडी देणाऱ्या एका कोंबडीस दिवसाकाठी ११० ग्रॅम खाद्य लागते तर गावरान कोंबडीस १३० ते १५० ग्रॅम खाद्य लागते. मिश्रण करताना एक किलोच्या प्रमाणात बाकी घटक घ्यावे. व्हिटॅमिन - ए,बी - २,डी - ३ आणि व्हिटॅमिन बी यांचे एकत्रित मिश्रण एक क्विंटल भरड धान्यास २० ग्रॅम लागते तसेच कॅल्शियम, लोह, मीठ, फॉसफरस, आयोडीन, सोडियम, पोटॅशियम, सेलेनियम, मॅग्नेशियम, मॅगनीज, झिंक आदी खनिजद्रव्ये मिसळावी. हाडांची बळकटी आणि अन्नपचनासाठी कोंबड्यांना खनिजांची आवश्यकता असते. कोंबड्यांच्या आहारात खनिजांचा वापर योग्य प्रमाणात केल्यास पायांतील अशक्तपणा दूर होतो. हाडांची योग्य पद्धतीने वाढ होते, त्यांना बळकटी मिळते. शरीरास कॅल्शिअम, लोह, मीठ, फॉस्फरस, आयोडीन, तांबे, सोडिअम, पोटॅशिअम, सेलेनिअम, मॅग्नेशिअम, मँगेनिज, झिंक इत्यादी खनिजांची आवश्यकता असते. जीवनसत्त्वामुळे कोंबड्यांमध्ये रोगप्रतिकारशक्ती निर्माण होते, उत्पादन वाढते. शरीर कार्यक्षम व तजेलदार राहण्यासाठी जीवनसत्त्वांचा उपयोग होतो. सर्वांचे मिश्रण मिक्सरमध्ये किंवा कोरड्या फरशीवर फावड्याच्या साह्याने करावे. सुमारे ६/७ मिनिटे फावड्याने विविध प्रकारे हलवून मिश्रण एकजीव करून घ्यावे. यासर्वांचे प्रमाण डॉक्टर किंवा अनुभवी व्यक्तीकडून माहिती करून घ्यावे.

# उसाचे योग्य व्यवस्थापन महत्त्वाचे

अवर्षण काळात तापमान वाढीमुळे बाष्पीभवनाचा वेग वाढतो. जमिनीतील उपलब्ध पाण्याचे प्रमाण कमी होते. मुळांच्या कार्यक्षेत्रातील तापमान वाढून मुळांची कार्यक्षमता कमी होते. त्यामुळे मुळाद्वारे पाणी आणि अन्नद्रव्यांचे शोषण कमी होते. हरितद्रव्यांचे प्रमाण घटल्यामुळे उसाची पाने पिवळी पडू लागतात. पूर्ववाढ व जोमदार वाढीवर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे कांड्यांची लांबी आणि जाडी कमी होऊन वजनात घट येते. उसामध्ये तंतुमय पदार्थांच्या प्रमाणात वाढ होऊन दशीचे प्रमाण वाढते. साखर चयापचय क्रियांवर परिणाम होऊन निर्मिती व उतारा घटतो. पाण्याचा तीव्र ताण बसल्यास वाढ खुंटते. कधी कधी सरळ उंच वाढण्याऐवजी डोळे फुटून पांगशा फुटतात.

उपाययोजना : ऊस पिकासाठी जास्तीत जास्त क्षेत्रावर शेतकऱ्यांनी ठिबक सिंचनाने पाणी व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. को ८६०३२, कोएम ०२६५ व को ७४० या जाती इतर जातींपेक्षा पाण्याचा ताण सहन करतात. त्यामुळे नवीन लागवडीसाठी अशा जातीचा प्राधान्याने वापर करावा. ज्या ठिकाणी पाण्याची उपलब्धता कमी आहे अशा ठिकाणी यापुढे पाणी देताना एक आड सरीतून पाणी द्यावे. पाण्याचा ताण पडत असल्यास उभ्या ऊस पिकातील खालची पक्व झालेली तसेच वाळलेली पाने काढून ती आच्छादन म्हणून सरीत पसरावी, जेणेकरून पाण्याचे बाष्पीभवन कमी होऊन जमिनीत ओलावा टिकून राहण्यास मदत होईल. पिकास पाण्याचा ताण पडत असल्यास दर तीन आठवड्यांनी २ टक्के म्युरेट ऑफ पोटॅश आणि २ टक्के युरिया यांचे मिश्रण करून पिकावर फवारणी करावी. पाण्याची कमतरता असल्यास बाष्पीभवन कमी करण्यासाठी ६ ते ८ टक्के केओलीन या बाष्परोधकाची फवारणी करावी. पाण्याची कमतरता असेल अशा ठिकाणी नेहमीच्या पाटाने पाणी देण्याच्या पद्धतीऐवजी सुरुवातीस खर्चिक असली तरी ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करावा. पीक तण विरहित ठेवावे. त्यामुळे उपलब्ध पाण्यासाठी होणारी स्पर्धा कमी होऊन ऊस वाढीसाठी उपयुक्त ठरेल. शेताच्या सभोवती उंच व जलद वाढणारी शेवरीसारखी पिके लावावीत. लागवडीच्या पिकात तसेच खोडव्यामध्ये हेक्टरी ५ ते ६ टन पाचटाचे आच्छादन करावे. प्रति टन पाचटासाठी ८ किलो युरिया, १० किलो सुपर फॉस्फेट आणि १ किलो पाचट कुजविणाऱ्या जिवाणूंचा वापर करावा.



हंगामनिहाय व्यवस्थापन :

१) आडसाली : सध्या आडसाली लागवडीचा ऊस जोमदार वाढीच्या अवस्थेमध्ये आहे. पाण्याचा ताण कमी करण्यासाठी एक आड सरीस पाणी द्यावे. वाळलेली पाने काढून सरीमध्ये आच्छादन करावे.

२) पूर्वहंगामी : सद्यःस्थितीत पूर्वहंगामी ऊस जोमदार वाढीच्या (७ ते ८ महिने) अवस्थेमध्ये आहे. या हंगामातील उसासाठी एक आड सरीतून पाणी द्यावे. खालील पाने काढून त्याचे सरीमध्ये आच्छादन करावे. पट्टा पद्धतीने लागवड केली असल्यास ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. पीक ताणविरहित ठेवावे.

३) सुरू हंगाम : सध्या पीक पूर्ववाढ व जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. एक आड सरीतून पाणी द्यावे. पीक तणविरहित ठेवावे. सरीमध्ये बाष्पीभवन कमी करण्यासाठी पाचट आच्छादन करावे. बांधणीच्या वेळेस पालाश खताची मात्रा शिफारशीपेक्षा २५ टक्के जास्त द्यावी. पिकास पाण्याचा ताण पडत असल्यास दर २१ दिवसांनी २ टक्के म्युरेट ऑफ पोटॅश आणि २ टक्के युरिया यांचे मिश्रण करून फवारणी करावी. पीक तणविरहित ठेवावे. ज्या ठिकाणी पट्टा पद्धतीने लागवड केलेली आहे अशा ठिकाणी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा.

४) खोडवा : सध्या खोडवा पीकपूर्व वाढ व जोमदार वाढीच्या अवस्थेत आहे. एक आड सरीतून पाणी द्यावे. खोडव्यामध्ये पाचट आच्छादन करावे. खोडव्यास पहारीच्या साह्याने पालाशची मात्रा शिफारशीपेक्षा २५ टक्के जास्त द्यावी. दर २१ दिवसांनी २ टक्के म्युरेट ऑफ पोटॅश आणि २ टक्के युरिया यांचे मिश्रण करून फवारणी करावी. पीक तणविरहित ठेवावे. पट्टा पद्धतीने लागवड केली असल्यास ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा.


# सुप्त कासदाहाची लक्षणे कशी ओळखायची?

जास्त दूध देण्याची क्षमता असणाऱ्या गायीची कास निरणाच्या खालच्या बाजूने बेंबीपर्यंत पसरलेली आणि भरदार असते. चाचपून पाहिल्यास ती मऊ लागते. दूध काढल्यावर कासेचा आकार लहान होतो. कासेवरची फुगीर नागमोडी शीर ठसठशीत असावी. गाय शक्यतो तीन ते चार वर्षांची आणि दुसऱ्या वेतातील असावी. आहारामध्ये त्यांच्या शरीर पोषणासाठी दोन ते अडीच किलो आणि दूध निर्मितीसाठी एकूण उत्पादनाच्या ४० टक्के एवढा सकस आहार द्यावा. अधिक उत्पन्न देणाऱ्या गाईच्या शरीरातून दुधाच्या स्वरूपात कॅल्शिअम बाहेर पडत असल्यामुळे या गाईची कॅल्शिअमची गरज भागविणे अत्यंत जरुरी असते. त्याचबरोबर इतर खनिजांचाही गाईच्या आहारात समावेश करणे आवश्यक असते. दुभत्या जनावराला दररोज नियमितपणे २५ ते ५० ग्रॅम खनिज मिश्रण पशुखाद्यातून खाऊ घालावे.

गाईच्या कासेची वाढ ही गाभण असताना होत असते. पहिल्या सहा महिन्यात पेशींची वाढ पूर्ण होऊन सातव्या महिन्यानंतर दूध देण्याची क्षमता त्या पेशीत येते. कासेतील पेशींची संख्या आणि त्यांची दूध देण्याची क्षमता हे गुण आनुवंशिक आहेत. चीक देण्याचे प्रमाण आणि दूध देण्याच्या प्रमाणाचा परस्परांशी काहीही संबंध नाही. गाईचे दूध देण्याचे प्रमाण तिसऱ्या, चौथ्या आणि पाचव्या वेतात वाढते. आधी आणि नंतर ते कमी असते. व्यायल्यापासून ३० ते ४५ दिवसात गाय जास्तीत जास्त दूध देते. नंतर दरमहा अंदाजे दहा टक्के दूध कमी होते.

नियमितपणे दूध देणारी गाय जनावर अचानक कमी दूध द्यायला लागली, की सुप्तावस्थेतील कासदाह झाला असण्याची शक्यता असते. हा आर्थिक दृष्ट्या अतिशय गंभीर स्वरूपाचा आजार आहे. हा आजार सुप्त आणि दृश्य अशा दोन्ही स्वरूपात आढळतो. दृश्य स्वरूपातील कासदाहात कासेला किंवा सडाला सूज येते. कासदाह झालेले सड टणक होतात, त्यांना स्पर्श होताच वेदना होतात. कासेला हात लावू देत नाही. काही वेळा सडात गाठी तयार होतात. सडातून दुधाऐवजी पू किंवा रक्तच येऊ लागते. अशावेळी तज्ज्ञ पशुवैद्याकडून तपासणी करून घ्यावी. पशुवैद्याच्या साहाय्याने प्रत्येक बाधित सडात सकाळी एक आणि संध्याकाळी एक अशी तीन ते पाच दिवस प्रतिजैविकाची ट्यूब सोडावी. पशुवैद्यकाकडून चार ते पाच दिवस प्रतिजैविकाची इंजेक्शन देऊन घ्यावीत. सुप्तावस्थेतील कासदाहामध्ये दृश्य असे कोणतेही लक्षण दिसत नाही. परंतु त्यांचे दूध हळूहळू कमी-कमी होत जाते. त्यामुळे पशुपालकाचेआर्थिक नुकसान होते. म्हणून दूध आणि कास तपासून घ्यावी.

व्यवस्थापनाचे मुद्दे : दूध काढणाऱ्यांनी स्वतःची, तसेच स्वतःच्या



कपड्याची स्वच्छता ठेवावी. नख कापलेली असावीत. गोठ्यात जनावरांची गर्दी टाळावी. गर्दीमुळे एका जनावराचे शिंग दुसऱ्याच्या कासेला लागून किंवा गायीने कासेवर पाय दिल्यामुळे कासेला किंवा सडांना जखमा होतात. गोठ्याची जमीन स्वच्छ व सपाट असावी. टोकदार दगड किंवा खिळे नसावेत. जनावरांच्या मलमूत्राची ताबडतोब विल्हेवाट लावावी. अंगठा आणि चारही बोटे यामध्ये सड दाबून दूध काढू नये. सडावर समान दाब देऊन धार काढावी. धार काढतेवेळी सडांना कोणताही चिकट पदार्थ लावू नये. दूध काढण्यापूर्वी जनावराची कास, शेपटी पोटॅशियम परमॅग्नेट, आयोडीन, क्लोरीन, ब्लिचिंग पावडर, जंतूनाशकाच्या सौम्य द्रावणाने धुवून कोरडी करावी आणि नंतर दूध काढावे. दूध काढण्यापूर्वी कासेला काथ्याच्या हाताळणाऱ्याने खरारा करावा. गाईच्या शरीरावरच्या केसांच्या दिशेने खरारा करावा. त्यामुळे तिच्या शरीरावरील धूळ, गळलेले केस, गोचीड, माशा, शेण इत्यादी निघून जाऊन शरीर स्वच्छ होते, तसेच ही घाण दुधात पडण्याचा धोका टळतो. खराऱ्यामुळे जनावराचे रक्ताभिसरण वाढून जास्तीत जास्त रक्त दूध निर्मितीसाठी कासेकडे जाते. धारा काढतेवेळी गवळ्याने धूम्रपान करू नये किंवा तंबाखू खाऊ नये. कारण या पदार्थाचा वास दुधाला लागण्याचा संभव असतो. दूध काढतेवेळी गाय शांत आणि समाधानी असावी. तिला मारझोड करून दूध काढण्याचा प्रयत्न करू नये. गाय पान्हवल्यानंतर सात ते आठ मिनिटातच संपूर्ण दूध काढावे. जास्त दूध देणाऱ्या गाईची धार दिवसातून तीन वेळा काढावी. दूध ठराविक वेळेस काढावे. गाय पूर्णपणे पिळावी. कासेत दूध शिल्लक राहू देऊ नये. दूध काढल्यानंतर सडाची छिद्र ताबडतोब बंद होत नाहीत. म्हणून साधारणतः अर्धा तास गाईला जमिनीवर बसू देऊ नये. त्याकरिता दूध काढते वेळेस गव्हाण चाऱ्याने भरलेली असावी. म्हणजे गाय चारा खात राहील आणि खाली बसणार नाही. गाय पान्हवण्यासाठी इंजेक्शनचा वापर टाळावा. कारण इंजेक्शनचा वारंवार वापर केल्यास त्याचा जनावराच्या प्रजनन क्षमतेवर विपरीत परिणाम होतो. दूध काढल्यानंतर गाईचे सड जंतुनाशक द्रावणात बुडवावेत.




## जागतिक दिवस

कारगिल विजय दिवस

राष्ट्रीय अमली पदार्थ विरोधी दिन

### महत्वाच्या घटना

१५०९ : सम्राट कृष्णदेवराय यांनी विजयनगर साम्राज्याच्या पुनरुत्पादन सुरूवात केली.
१७४५ : इंग्लंडमधील गिल्डफोर्ड येथे महिलांचा पहिला क्रिकेट सामना झाला.
१७८८ : न्यूयॉर्क अमेरिकेचे ११ वे राज्य बनले.
१८४७ : लायबेरिया स्वतंत्र झाला.
१८७६ : ब्रिटीश कालीन भारतातील कलकत्ता शहरात इंडियन असोसिएशन ची स्थापना करण्यात आली होती.
१८९१ : फ्रान्सने ताहिती बेटे ताब्यात घेतली.
१९०२ : कोल्हापूर संस्थानात आरक्षणाची तरतूद.
१९५३ : फिदेल कॅस्ट्रो यांच्या मोंकडा बैरक्स वरील अयशस्वी हल्ल्यामुळे क्युबन रिव्होल्यूशनची सुरुवात झाली, हीच चळवळ २६ जुलै ची क्रांती म्हणून ओळखली जाते.
१९५६ : जागतिक बँकेने आस्वान धरण बांधण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यास नकार दिल्यावर ईजिप्तचे राष्ट्राध्यक्ष गमाल नासर यांनी सुएझ कालव्याचे राष्ट्रीयीकरण केले.
१९६३ : सिनकॉमया पहिल्या भूस्थिर उपग्रहाचे प्रक्षेपण.
१९६५ : मालदीवला (इंग्लंडपासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९९४ : सनईवादक उस्ताद बिस्मिला खाँ यांना 'राजीव गांधी सद्भावना पुरस्कार' जाहीर
१९९८ : १९९७ मधील सर्वोत्कृष्ट कामगिरीबद्दल विश्वनाथन आनंद याला प्रतिष्टेचा 'चेस ऑस्कर' पुरस्कार प्रदान
१९९९ : भारतीय क्रिकेटसाठी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल दिल्या जाणार्या सी. के. नायडू पुरस्कारासाठी माजी कर्णधार पॉली उम्रीगर यांची निवड
१९९९ : भारताचा कारगिल युद्धात विजय झाला.
२००५ : मुंबई परिसरात २४ तासात सुमारे ९९५ मिमी पाऊस झाल्याने शहरात ठिकठिकाणी पूर येऊन शेकडो लोक मृत्यूमुखी पडले.
२००५ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने आपले अंतरीक्ष यान डिस्कव्हरी चे प्रक्षेपण केले.
२००८ : अहमदाबादमधे झालेल्या २१ बॉम्बस्फोटांमधे ५६ जण ठार तर २०० जण जखमी झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१०९४ : फ्लाइट सिम्युलेटर चे शोधक एडविन अल्बर्ट लिंक यांचा जन्म. (मृत्यू: ७ सप्टेंबर १९८१)
१८४४ : भारतीय कलकत्ता येथील उच्च न्यायालयाचे न्यायाधीश व कलकत्ता विद्यापीठाचे पहिले भारतीय कुलगुरू गुरूदासदास बॅनर्जी यांचा जन्मदिन.
१८५६ : जॉर्ज बर्नार्ड शॉ नोबेल पारितोषिक विजेते आयरिश लेखक आणि लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सचे सहसंस्थापक (मृत्यू: २ नोव्हेंबर १९५०)
१८६५ : भारतीय कवी आणि संगीतकार रजनीकांत सेन यांचा जन्म. (मृत्यू: १३ सप्टेंबर १९१०)
१८७५ : कार्ल युंग मानसशास्त्रज्ञ व मानसोपचारतज्ञ (मृत्यू: ६ जून १९६१)
१८९३ : पं. कृष्णराव शंकर पंडित ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक. राष्ट्रपती डॉ. राजेन्द्रप्रसाद यांनी त्यांचा 'राष्ट्रीय गायक' म्हणून गौरव केला होता. (मृत्यू: २२ ऑगस्ट १९८९)
१८९४ : अल्डस हक्सले ब्रिटीश लेखक व तत्त्वज्ञ तसचं, काल्पनिक कथा व कादंबरीकार (मृत्यू: २२ नोव्हेंबर १९६३)
१८९४ : वासुदेव गोविंद मायदेव ''शिशुगीते'' हा संगीताचा प्रकार मराठी भषेत रूळविणारे महान महाराष्ट्रीयन मराठी बालगीत कवी (मृत्यू: ३० मार्च १९६९)
१९०४ : फ्लाइट सिम्युलेटर चे शोधक एडविन अल्बर्ट लिंक यांचा जन्म. (मृत्यू: ७ सप्टेंबर १९८१)
१९१४ : प्रसिद्ध भारतीय कवयित्री विद्यावती कोकीळ यांचा जन्मदिन.
१९२७ : भारतीय क्रिकेट खेळाडू जी. एस. रामचंद यांचा जन्म.
१९२८ : भारतीय-पाकिस्तानी लेखक आणि कवी इब्न-ए-सफ़ी यांचा जन्म. (मृत्यू: २५ जुलै १९८०)
१९३९ : ऑस्ट्रेलियाचे वे२५ पंतप्रधान जॉन हॉवर्ड यांचा जन्म.
१९४२ : स्लोव्हेकियाचे पंतप्रधान व्लादिमिर मेसियर यांचा जन्म.
१९४९ : थायलंडचे पंतप्रधान थाकसिन शिनावात्रा यांचा जन्म.
१९५४ : व्हिटास गेरुलायटिस अमेरिकन लॉन टेनिसपटू (मृत्यू: १७ सप्टेंबर १९९४)
१९५५ : असिफ अली झरदारी पाकिस्तानचे ११ वे राष्ट्राध्यक्ष
१९७१ : खलिद महमूद बांगलादेशी क्रिकेटपटू
१९८५ : मुग्धा गोडसे अभिनेत्री व मॉडेल
१९८६ : अभिनेत्री मॉडेल मुग्धा गोडसे यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

८११ ई.पुर्व : बायझेन्टाईन सम्राट निसेफोरस यांचे निधन.
१३८० : जपानी सम्राट कोम्यो यांचे निधन.
१८४३ : टेक्सासच्या प्रजासत्ताकचे राष्ट्राध्यक्ष सॅम ह्युस्टन यांचे निधन.
१८६७ : ग्रीसचा राजा ओट्टो यांचे निधन.
१८९१ : राजेन्द्रलाल तथा राजा मित्रा बंगालमधील प्राच्यविद्या संशोधक, एशियाटिक सोसायटीचे पहिले अध्यक्ष (१८८५), भारतीय चित्रकला, शिल्पकला, राजकीय आणि सामाजिक विषयांवरील भाष्यकार (जन्म: १५ फेब्रुवारी १८२४)
१९५२ : अर्जेन्टिनाचे अध्यक्ष जॉन पेरोन यांची पत्नी एव्हा पेरोन यांचे निधन.
१९६७ : भारतातील प्रसिद्ध इतिहास, संस्कृत, कला आणि साहित्यांचे अभ्यासक व दिल्ली येथील राष्ट्रीय पुरातत्व संग्रहालयाचे सह-संस्थापक वासुदेव शरण अग्रवाल यांचे निधन.
२००५ : माजी कॅनडीयन हॉकीपटू जीन गिलेस मारॉटे यांचे निधन.
२००९ : भास्कर चंदावरकर प्रसिद्ध भारतीय सितार वादक, शैक्षणिक, चित्रपट व नाट्य संगीतकार (जन्म: १६ मार्च १९३६)
२०१० : भारतीय राजकारणी शिवकांत तिवारी यांचे निधन. (जन्म: २० डिसेंबर १९४५)
२०१५ : भारतीय वकील आणि राजकारणी बिजॉय कृष्णा हांडिक यांचे निधन. (जन्म: १ डिसेंबर १९३४)

# ट्रान्सपोर्ट रोडमुळे डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपूल बनतोय चिखलमय!

## सार्वजनिक बांधकाम विभागाने मार्गावरील खड्डे त्वरित दुरुस्त करावेत;मुख्याधिकारी साहेब लक्ष कधी देणार-ॲड.मनोज संकाये

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

**परळी येथील ट्रान्सपोर्ट रोडमुळे डॉक्टर श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाण पुलावर येणाऱ्या वाहतुकीच्या वाहनांमुळे हा मार्ग चिखलमय झाला आहे. याचा तेथील नागरिकांना त्रास भोगावा लागत असून वाहतूकदारांना सुद्धा अडचणीचा सामना करावा लागत आहे. नागरिकांची या त्रासातून सुटका व्हावी तसेच पुलावरील खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने दुरुस्त करावे आणि मंजूर झालेल्या ट्रान्सपोर्ट रोजचे काम त्वरित सुरू करावे अशी मागणी नगरपालिकेचे मुख्याधिकारी आणि सार्वजनिक विभागाचे मुख्य अभियंता यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी केली आहे.**

रेल्वे उड्डाणपूल ला खालील ट्रान्सपोर्ट रोड वरून मालाची वाहतूक करणारी जड वाहने ब्रिजवरून जात असतात. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे आणि त्या रोडवर चिखल साचल्यामुळे त्या वाहनांच्या चाकांना माती लागल्यामुळे सर्वत्र चिखल पसरला आहे त्याचा परिणाम म्हणून वाहनधारक तेथे त्यांचे एक्सीडेंट होत आहेत. पायी चालणारे हे सुद्धा या चिखलात घसरून पडत असल्यामुळे त्यांना मणक्याचे



त्रास होत आहेत. या प्रकरणांमध्ये नगरपालिकेचे मुख्य अधिकारी श्री त्रिंबक कांबळे हे जाणून बुजून दुर्लक्ष करत आहेत असे नागरिक बोलत आहेत.

परळी वैजनाथ हे ज्योतिर्लिंगाचे ठिकाण असून येथे दर्शनासाठी राज्यभरातून तसेच बाहेरच्या राज्यातून नागरिक येतात येणाऱ्या नागरिकांना परळी वैद्यनाथाचे नवल असते मात्र शहराचे मार्ग पाहिल्यास त्यांची निराशा होते. त्यामुळे उड्डाण पुलावडील मार्गावर पडलेले खड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाने पवित्र श्रावण महिन्याच्या अगोदर दुरुस्त करावेत अशी मागणी सार्वजनिक खात्याकडे त्यांनी केली आहे. या रोडवर सर्वत्र खड्डे पडले असून या खड्ड्यांमध्ये पाणी साचले आहे. पाणी साचल्यामुळे तेथील नागरिकांना रहदारीसाठी त्रास आणि अडचण भोगावी लागत आहे. मालवाहतूक करणारी जड वाहने अंबाजोगाईकडे जातात किंवा परभणी रोड बीड रोड या रोडवर ही वाहतूक मोठ्या प्रमाणावर आहे. नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याशी संपर्क केला असता त्यांच्याकडून अपेक्षित उत्तर मिळत नसल्याच्या तक्रारी येत आहेत त्यामुळे जाणून बुजून दुर्लक्ष करणारे मुख्याधिकारी यांना सामान्य जनता माफ करणार नाही. या प्रकरणी परळीचे तहसीलदार तसेच नायब तहसीलदार श्री. रुपनर साहेब यांच्याकडे पाठपुरावा केला आहे तरी या गंभीर विषयाची त्यांनी दखल घ्यावी अशी विनंती त्यांनी केली आहे.

# टेंभुर्णी येथे ५१ घरकुलांना मंजुरी

**शिरूर। प्रतिनिधी**

तालुक्यातील टेंभुर्णी येथे यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत ५१ घरकुलांना मंजुरी मिळाली आहे.सरपंच मिथुन डोंगरे यांनी माजी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून सातत्याने पालकमंत्री अतुल सावे यांच्याकडे या संदर्भात केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.राज्य शासनाच्या मागास कल्याण विभागाच्या वतीने यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेंतर्गत गरीब आणि गरजू घटकांना याचा लाभ देण्यात येणार आहे.मिथुन डोंगरे यांनी आपल्या एक ते दिड वर्षांच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली असून त्या मध्ये शेतकऱ्यांसाठी वैयक्तिक जलसिंचनच्या चाळीस विहिरींसह वीस गायगोठे,सहा पांदण रस्ते,मंदिरासाठी भव्य सभामंडप आणि पेव्हर ब्लॉक,सिमेंट रस्त्यांची कामे करण्यासह शेतकऱ्यांना मोफत बियाणे वाटप करण्याच्या कामांचा समावेश आहे.भविष्यात देखील शासनाच्या वतीने ज्या काही गरजू लोकांसाठी आणि गावाच्या विकासासाठी योजना असतील त्या देखील राबविण्यासाठी आपण माजी आमदार सुरेश धस यांच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याचे देखील सरपंच मिथुन डोंगरे यांनी सांगितले.घरकुल योजनेचा लाभ दिल्याबद्दल लाभार्थ्यांच्या वतीने माजी आमदार सुरेश धस यांचे आभार व्यक्त करण्यात आले आहे.

# गुरु शिष्य परंपरा हा भारतीय संस्कृतीचा आत्मा-वर्षा मुंडे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**'सनातन भारतीय संस्कृतीमध्ये अध्ययन - अध्यापन प्रक्रिया यांचे खूप मोलाचे स्थान आहे. त्यात गुरु आणि शिष्य हे दोन महत्त्वाचे घटक असून ही गुरु - शिष्य परंपरा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे,'' असे प्रतिपादन भा.शि.प्र.संस्थेच्या केंद्रीय कार्यकारिणी सदस्या सौ. वर्षा मुंडे यांनी केले. त्या खोलेश्वर महाविद्यालयात गुरुपौर्णिमेनिमित्त आयोजित तसेच सांस्कृतिक विभागाचे उद्घाटन या कार्यक्रमांच्या निमित्ताने प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या.**

याप्रसंगी व्यासपीठावर खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाच्या शालेय समितीचे अध्यक्ष श्री. उन्मेष मातेकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, उपप्राचार्य प्रा.बिभीषण फड,प्रा.डॉ. सुभाष पटेकर,डॉ. रवींद्र कुंबेफळकर, पर्यवेक्षक प्रा. योगेश कुलकर्णी, प्रा. आनंद पाठक, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. तात्या पुरी व प्रा. शैलेश पुराणिक यांची प्रमुख उपस्थिती होती. नाट्य व नृत्य इत्यादी कलांची जोपासना ही गुरूंच्या मार्गदर्शनातच केली पाहिजे तेव्हाच शिष्य यशस्वी होऊ शकतो. संगीत, नाट्य या कला आनंद देणाऱ्या असतात. या सर्व परंपरा जोपासण्याचे काम सांस्कृतिक मंडळाचे आहे. भारतीय संस्कृती ही उन्नत आणि अखंड प्रवाह होणारी आहे ज्यात गुरु शिष्य परंपरा ही वैशिष्ट्यपूर्ण आहे. गुरुच्या सानिध्यात आत्मज्ञान, व्यावहारीक ज्ञान, अध्यात्मिक ज्ञान प्राप्त करून स्वतःला सिद्ध करणारे शिष्य यांची परंपरा भारत देशाला लाभली आहे असे सांगून त्यांनी गुरुपौर्णिमेच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या तसेच सांस्कृतिक विभागाचे उद्घाटन झाले असे जाहीर केले. याप्रसंगी श्री. उन्मेष मातेकर यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ते म्हणाले की प्राचीन काळी भारतीय संस्कृती ही अत्यंत पुढारलेली होती. प्राचीन काळी अनेक विद्यापीठे आपल्या देशात कार्यरत होती. ही विद्यापीठे व येथील ज्ञान परंपरेवर आघात करण्याचा प्रयत्न अनेक परकीय शक्तींनी केला परंतु केवळ गुरु- शिष्य परंपरेमुळेच आपली हिंदू संस्कृती टिकून राहिली आहे. आपला पहिला गुरु ही आई असते, नंतर पालनकर्ते वडील व त्यानंतर शिकवणारे शिक्षक असतात. या तिन्हीही गुरूंना आपण योग्य तो आदर, सन्मान दिला पाहिजे व या सर्व गुरूंनी दिलेले ज्ञान आत्मसात करून ते पुढील पिढीकडे संक्रमित केले पाहिजे तसेच तेवत असलेली संस्कृतीची ज्योत कायम ठेवण्यासाठी गुरु -शिष्य परंपरा चालू ठेवली पाहिजे, असे विचार व्यक्त केले. श्री. जयेंद्र कुलकर्णी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की विद्यार्थ्यांनी त्यांच्या जीवनातील प्रश्न सोडवण्यासाठी पुस्तके व गुरूंचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. गुरूंची परंपरा आजही भारतीय संस्कृतीत टिकून आहे असे सांगून गुरु - शिष्य परंपरेतील अनेक उदाहरणे त्यांनी यावेळी सांगितली. याप्रसंगी त्यांनी गुरूंचे महत्त्व वर्णन करणारे एक गीत गायले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवर्षी म्हणाले की विद्यार्थी आणि गुरु यांचे नाते दीर्घकाळ टिकले पाहिजे तेव्हाच विद्यार्थ्याला योग्य दिशा प्राप्त होऊन तो यशस्वी होऊ शकतो. आई आणि शिक्षक हेच आपले खरे गुरु असतात. त्यांना आपण वंदन केले पाहिजे, असे विचार व्यक्त करून त्यांनी याप्रसंगी स्वामी विवेकानंद- रामकृष्ण परमहंस, अर्जुन -गुरु द्रोणाचार्य, एकलव्य -द्रोणाचार्य, चंद्रगुप्त मौर्य - आर्य चाणक्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर- आंबेडकर गुरुजी व पानसे गुरुजी या आदर्श गुरु शिष्यांच्या जोडींची उदाहरणे याप्रसंगी विद्यार्थ्यांना सांगितली.या कार्यक्रमात कु. शिवकन्या शिंदे,कु. नंदिनी जगताप,कु. प्रीती गंगणे,कु. वैष्णवी पौळ,कु.आरती शिंदे,कु. शामल तिडके कु. कार्तिकी ठवरे आदी विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सौ. अनिता बर्दापूरकर, प्रा. दत्तप्रसाद गोस्वामी,कु. वेदश्री जड व कु.राणी घारुळे यांनी केले तर आभार प्रा. डॉ.अजय डूबे यांनी मानले.

# आष्टी तालुक्यातील अरणविहिरा येथील पांदण रस्त्याचा बोजवारा ; पं.स.प्रशासनाचा भोंगळ कारभार

**कडा । प्रतिनिधी**

गावातील लोकांना हाताला काम मिळाले पाहिजे या दृष्टिकोणातून शासनाने प्रत्येक गावात,खेड्यात राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना राबविली जाते.मात्र हीच योजना गैरव्यवहाराचे कुरण ठरत असल्याचे दिसून येत आहे. या रस्त्याच्या संदर्भात १३ जून २०२४ ला रीतसर तक्रार करून सुध्दा कोणत्याही प्रकारची कारवाई न केल्याने पंचायत समितीच्या अधिकारी व कर्मचारी यांच्याशी अर्थपूर्ण व्यवहाराचा वास येत असून ठराविक लोकांनी ग्रामीण रोजगार हमी योजनेचा गैरफायदा घेतात.शासनाची दिशाभूल करत आहेत.असाच काहीसा प्रकार आष्टी तालुक्यातील अरणविहीरा येथे घडला आहे महात्मा गांधी रोजगार हमी योजनेअंतर्गत वस्ती वर किंवा शेतात जाण्यासाठी गि-हे वस्ती ते शिंदे वस्ती या रस्त्याचे काम मंजुर करण्यात आलेले आहे, सदरील रस्त्याचे काम हे लोक सहभागातून ब-याच अंशी पूर्ण करणे गरजेचे होते,या रस्त्यावर काहीही काम न करता संबंधित कंत्राटदारांनी पंचायत समिती कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना हाताशी धरून बोगसरीत्या मजुरामार्फत काम केल्याचे दाखवून लाखों रूपायाचे देयक उचलले आहे, याबाबत ग्रामस्थांनी जाब विचारला असता चुकीची महिती देऊन धमकावले जात आहे व उर्वरित कुशलची बिल काढण्यासाठी जेसीबी मशीनने थातूरमातूर काम करण्याचा प्रयत्न ग्रामस्थांनी हाणून पाडल्यामुळे संतप्त होऊन धमकी दिली जाते.या कामावर नियंत्रण ठेवणारे पंचायत समितीचे अधिकारी,कर्मचारी यांच्यासह बोगस काम दाखवून शासकीय निधीचा अपहार करणारे कंत्राटदार यांच्याविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करून फौजदारी गुन्हा दाखल करावा तसेच याबाबत ताबडतोब कार्यवाही न झाल्यास किंवा शासनाने याची गंभीर दखल घेतली नाही तर अरणविहिरा ग्रामपंचायत सदस्य साखरबाई शिरसाठ यांनी आंदोलनाचा इशारा दिला असून ग्रामस्थांसह तहसील कार्यालय आष्टी येथे आंदोलन करणार असल्याचा इशारा निवेदनाद्वारे पंचायत समिती मार्फत जिल्हाधिकारी बीड यांना दिला आहे. काही लोकांना पैशाचे अमिष दाखवले.त्यांच्या खात्यावर मोठ्या प्रमाणात रक्कम टाकली.त्यांची नावं हजेरीपटावर दर्ज करण्यात आली, असा आरोप करण्यात आलाय. याशिवाय या बोगस बँक खात्यामध्ये रक्कम टाकण्यात आली.जे कामे झाले म्हणून दाखवित आहेत त्या सर्व कामाचे देयके,हजेरीपट,बँक स्टेटमेन्ट संपूर्ण कागदपत्रे तयार आहेत.पांदण रस्त्यावर मुरुमाची रॉयल्टी किती ब्रासची याची संपूर्ण माहिती देण्यात यावी.मोक्यावर येऊन गावाकऱ्यासमोर पांदण रस्त्याची चौकशी करण्यात यावी,अशी गावकऱ्यांची मागणी आहे.दोषी अधिकारी,पदाधिकारी यांना पदमुक्त करून गुन्हा दाखल करण्यात अशी मागणी केली आहे.अन्यथा गावकऱ्यांसह तहसील कार्यालयासमोर आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे.यासंदर्भात ग्रामपंचायत सदस्य साखरबाई शिरसाठ यांनी तक्रार केली आहे. या संदर्भात गटविकास अधिकारी यांच्याशी संपर्क साधला असता तो न झाल्याने त्यांची बाजू समजली नाही

# महावितरण कार्यालयाच्या गलथान कारभार!

## विद्यार्थी व नागरिकांच्या जीवितास धोका, वीज पुरवठा करणारे केबल पावसात उघड्यावरच

**केज । प्रतिनिधी**

महावितरण कार्यालयाच्या गलथान कारभारामुळे विद्यार्थी व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला असून महावितरण कार्यालयाच्या विद्युत रोहित्राच्या बोर्डामधुन आनंद नगरीला वीज पुरवठा करणारे केबल जमिनीवर भर पावसात व पाण्यात उघड्यावरच आहेत यास जबाबदार कोण?असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे.या बाबतची सविस्तर माहिती अशी की,पंचायत समिती च्या प्रांगणामध्ये महा वितरण कार्यालयाचे दोन विद्युत रोहित्र आहेत सदर रोहित्राचे वीज पुरवठा करणारे केबल (वायर) उघड्यावर आहेत व या रोहित्राचे फ्युज फुटलेले आहेत.मागील



आठ ते दहा दिवसांपूर्वी केज शहरात पंचायत समितीच्या प्रांगणावर आनंदनगरी आलेली आहे. सदर रोहित्रा मधून महा वितरण कार्यालयाने आनंद नगरीला वीज पुरवठा दिला आहे.परंतु सदर वीज पुरवठा करणारे केबल (वायर) हे जमिनी वर पावसात,पाण्यात, चिखलात उघडे आहे सदर केबलला जॉईंट आहेत व सदर केबलच्या वरील भागाचे कव्हर निघलेले आहे व आनंद नगरीचा लाईटचा बोर्ड देखील उघड्यावरच आहे त्या बोर्डामध्ये देखील लाईटचे वायर व फ्युजच्या तारा उघड्या पावसामध्येच आहेत.या प्रांगणाच्या जवळच एक शाळा, शिक्षकांची सहकारी पतपेढी गटशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय आहे.या शाळेतीलविद्यार्थी हे या प्रांगणावरती खेळत आहेत व अहिल्यादेवी नगर,वकीलवाडी या भागातील नागरिक हे देखील या ठिकाणाहून रहदारी करत असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या व नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे यास कोण जबाबदार ? असा सवाल नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. महावितरण कार्यालयाने आनंद नगरीला विज पुरवठा हा जमिनीतून न करता तो वीजपुरवठा करणारे केबल वायर हे विद्युत रोहित्राच्या पोल वरून अथवा लाकडाच्या सहाय्याने वरती बांधून द्यायला पाहिजे होते असे स्थानिक नागरिकांतून बोलले जात आहे.

# बीड जिल्ह्यासाठी २४७ होमगार्डची होणार नियुक्ती

**बीड ।प्रतिनिधी**

**बीड जिल्हयात होमगार्डमध्ये काम करण्याची संधी उपलब्ध असून २४७ होमगार्डच्या रिक्त आहेत. अनुशेष भरण्यासाठी होमगार्ड नोंदणीचे आयोजन दि. २२ ऑगस्ट २०२४ पासून पोलीस मुख्यालय बीड येथे केले आहे. दि. २६ जुलै २०२४ ते १६ ऑगस्ट २०२४ अखेर ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले असून होमगार्ड नोंदणीचे माहितीपत्रक नियम व अटीबाबत विस्तृत माहिती** https://maharashtracdhg.gov.in/mahaha/ioginl.php **या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.यासाठी जिल्हयातील स्त्री, पुरुष अर्ज करु शकतात.**

निवड होऊन पात्र ठरलेले उमेदवार हे वेतनी सेवेत असतील तर त्यांना वेतनी सेवेत असल्यास कार्यालयाचे अथवा मालकाचे नाहरकत प्रमाणपत्र, पोलीस चारित्र्य पडताळणी अहवाल आणि सक्षम वैद्यकीय अधिका-याचे शारिरिकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र, माजी सैनिक अथवा एनसीसी प्रमाणपत्रधारक इतर अन्य तपशीलाच्या पृष्ठयर्थ सर्व संबधित प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवारास नोंदणीच्या वेळी त्यांना स्वखर्चाने यावे लागेल तसेच नोंदणीच्यावेळी कोणतिही अपघाती घटना घडल्यास त्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. उमेदवाराची निवड पुर्णपणे गुणवत्तेवर करण्यात येईल. सदर अनुशेषामध्ये बदल करण्याचा अधिकार जिल्हा समादेशक होमगार्ड बीड यांना राहील. तरी होमगार्डमध्ये सेवा करु इच्छित असलेल्या बीड जिल्हयातील रहीवासी उमेदवारांनी नोंदणी करिता अर्ज करावा, असे आवाहन जिल्हा समादेशक तथा अपर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर यांनी केले आहे.

# शिक्षणाचे तीर्थक्षेत्र संस्कृती विद्यालयात माता पिता पूजनाने गुरुपौर्णिमा साजरी

**बीड । प्रतिनिधी**

**भारतीय संस्कृतीमध्ये प्रत्येक सणाचे एक वेगळे महत्त्व आहे. २१ जुलैला गुरुपौर्णिमा होती, या दिवशी संस्कृती विद्यालयातील ३००विद्यार्थ्यांचे आई आणि वडील गुरुपौर्णिमा सोहळ्याला आले होते. यावेळी स्वतः डॉक्टर श्री दत्ता नलावडे सर यांनी स्वतःच्या आईचे गुरुपूजन केले ही बाब इतरांसाठी प्रेरणादायी ठरली.**

तसेच डॉ. नलावडे सरांचे अनुकरण करून विद्यार्थ्यांनी आपापल्या आईवडिलांचे गुरुपौर्णिमेनिमित्त दर्शन घेतले. आई-वडिलांनी त्यांना डोक्यावर हात ठेवून आशीर्वाद दिला. मी अभ्यास करेन व खूप मोठा होऊन तुमचे नाव मोठे करेल असा संकल्प यावेळी विद्यार्थ्यांनी केला . तसेच सर्व विद्यार्थ्यांनी संस्कृती





विद्यालयातील सर्व शिक्षक वृंदांचे गुच्छ देऊन स्वागत केले, एकूणच अत्यंत भावनिक आणि हृदयस्पर्शी हा प्रसंग होता. प्रत्येक व्यक्तीचे प्रथम गुरू हे त्याचे आई आणि वडील असतात, त्यांचे पूजन हा एक अनोखा उपक्रम गुरुकुलाने राबवला, अत्यंत उत्साहात कार्यक्रम साजरा झाला, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भैया सर यांनी केले, प्रस्ताविक खेडकर मॅडम यांनी केले, गुरुपौर्णिमेचे महत्त्व विशद करतांना भारतीय संस्कृतीमध्ये गुरूंचे स्थान आणि त्यामध्ये आई-वडिलांचे असलेले महत्त्व याविषयी डॉ . दत्ता नलावडे सर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम युट्युबवर लाईव्ह दाखवण्यात आला गुरुपौर्णिमेनिमित्त सामूहिक ग्रंथाचे पूजन करण्यात आले. ग्रंथ हाच गुरु हा मंत्र यावेळी उपस्थितांना दिला व ग्रंथ आपले जीवन समृद्ध बनवते. आधुनिक काळामध्ये वाचन संस्कृती ही कमी होत चालली आहे, तिचे पुनर्जीवन करणे आवश्यक आहे, असेही पुढे बोलताना संस्थापक/अध्यक्ष डॉ. दत्ता नलावडे सर यांनी सांगितले. एक आगळावेगळा हृदयस्पर्शी , अलौकीक असा कार्यक्रम गुरुपौर्णिमेनिमित्त साजरा झाला याचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे .

# जन्माला आलेल्या व्यक्तीला सद्गुरू शिवाय मोक्षप्राप्ती नाही-श्री गुरू मानूरकर महाराज

## नागनाथ देवस्थान जहागीरदार मठ संस्थान मानूर येथे गुरूपौर्णिमा उत्साहात

**मानूर । प्रतनिधी**

**शिरूर कासार तालुक्यातील मानूर येथे श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान जहागिरदार मठसंस्थानात गुरू-शिष्य नाते अबाधित राहण्यासाठी प्रति वर्षाप्रमाणे यावर्षीही गुरुपौर्णिमा उत्सव रविवार दि.२१/७/२०२४ रोजी श्री ष ब्र १०८ गुरू विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांच्या दिव्य सानिध्यात संपन्न झाला यावेळी महाराष्ट्रासहित परराज्यातून मानूर मठाचे शिष्य सदभक्त हजारोंच्या संख्येने उपस्थित होते.**

गुरुपौर्णिमेनिमित्त मठ संस्थानातील सर्व गुरूसमाधीस लघुरुद्राभिषेक, सद्गुरु नागनाथ महाराज यांना रुद्राभिषेक, गुरु महाराजांची इष्टलिंग महापूजा व शिवदिक्षा संस्कार सोहळा संपन्न झाला यावेळी सुमारे १५० ते २०० शिष्यांनी शिवदिक्षा घेतली. त्याचबरोबर मठाचे शिष्य जे की शासनाच्या अधिकारी पदावर आहेत अशा अनेक गणमान्य व्यक्तींचा सत्कार सन्मान



गुरु महाराजांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिवानंद स्वामी अरणगांव यांनी शिवदिक्षेचे महत्त्व पटवून देताना सर्व धर्मामध्ये प्रत्येक आराध्यला अनन्य साधारण महत्त्व दिलेले आहे परंतु वीरशैव धर्मामध्ये जो जगाचा मालक आहे तो आपल्या गळ्यामध्ये (इष्टलिंग) बांधला जातो म्हणजेच अनेक धर्मामध्ये दर्शन घेण्यासाठी मंदिरामध्ये जावे लागते परंतु वीरशैव धर्मामध्ये मंदिरच व्यक्ती होतो म्हणजेच जीवच शिव होतो याचा मुख्य संस्कार म्हणजे शिवदीक्षा.त्याचबरोबर भूम येथून आलेले अशोक अप्पा तोडकर यांनी वीरशैव धर्म हा ज्ञानदानासाठी आहेच परंतु विज्ञानाला सुद्धा पाठीमागे टाकेल असे संस्कार या धर्मामध्ये आहेत यानुसार आपल्या मठामध्ये असंख्य कार्यक्रम होतात असंख्यभक्त मंडळी येतात आपण सुद्धा समाजाचे काहीतरी देणे लागतो यासाठी अन्नदान करतात त्यानुसार मठामध्ये भविष्याच्या दृष्टीने येणाऱ्या भक्तांना पात्रामध्ये न जेवण करता ताटामध्ये जेवण करता यावे यासाठी आज आपण संकल्प करूया असे मनोगत व्यक्त केले. वीरशैवधर्मामध्ये जन्माला आलेल्या व्यक्तीला विविध संस्कार अत्यंत महत्त्वाचे असतात त्यामध्ये प्रामुख्याने शिवदीक्षा संस्कार अत्यंत महत्त्वाचा आहे कारण वीरशैव धर्मामध्ये जो व्यक्ती मृत होतो त्या व्यक्तीच्या हातावर इष्टलिंग देऊन त्याची समाधी क्रिया पूर्ण केली जाते अशावेळी जो इष्टलिंग हातामध्ये दिला जातो तो व्यक्तीच्या जन्माच्या अगोदरपासून असतो तोच दीक्षा विधी वेळेला असतो आणि हाच इष्टलिंग हातामध्ये देऊन त्या व्यक्ती समाधी क्रिया केली जाते म्हणून प्रत्येक वीरशैवाने इष्टलिंग,विभूती(भस्म) धारण करणे त्याचबरोबर गळ्यामध्ये रुद्राक्ष माळा धारण करणे आणि आपल्या गुरु मंत्राचा जप करणे अत्यंत महत्त्वाच्या आहे त्याचबरोबर सर्वसामान्य व्यक्तीने आपल्या जन्मामध्ये मोक्ष प्राप्त करून घ्यावयाचे असेल तर आपल्या जीवनामध्ये गुरु मंत्र घेणे अत्यंत गरजेचे आहे कारण गुरुशिवाय मार्ग सापडत नाही आणि गुरुशिवाय आपण मोक्ष पदाला जाऊ शकत नाही. अनेक व्यक्तींना वाटते की जप केल्यानंतर काय फायदा मिळतो परंतु जप केल्यानंतर माणसाच्या मनातील मलीनता दूर होते माणसाच्या मनातील नकारात्मकता निघून जाते आणि सकारात्मक भाव त्या व्यक्तीच्या मनामध्ये निर्माण होतो आणि त्यावेळी आपल्या जीवनामध्ये येणारी असंख्य संकटे ही गुरमंत्राच्या नामस्मरणाने दूर होतात. नामस्मरण करण्यासाठी कोणत्याही ज्ञानाची गरज नसून मनाचा समर्पण भाव महत्त्वाचा आहे, असे उद्गार यावेळी मठाधिपती श्री ष ब्र १०८ गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांनी केले. त्यानंतर सर्व दिक्षार्थी व्यक्तींना गुरूमंत्र देण्यात आला व तीर्थप्रसाद घेत सर्व शिष्य सदभक्तांनी महाप्रसाद घेऊन या गुरूपौर्णिमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातून हजारोंच्या संख्येने मानूर मठसंस्थांनचे अनेक शिष्य सदभक्तांनी व मानूर पंचक्रोशीतील सर्व ग्रामस्थांनी या गुरूपौर्णिमाची कार्यक्रमासाठी आपली उपस्थिती दर्शविली.

# लोकमान्य लोकनेत्या पंकजाताई मुंडे

महाराष्ट्राच्या राजकारणात 'मुंडे' नावाचा जो आज दबदबा आहे तो केवळ लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यामुळे..आणि त्यांच्यानंतर हा दबदबा असाच पुढे टिकून राहिलाय तो 'ताईसाहेब' अर्थात पंकजाताई यांच्यामुळेच..हे त्रिवार सत्य आहे. पंकजाताईंची राजकीय ताकद, आक्रमक शैली, सर्वांना सोबत घेऊन जाणारं त्यांचं नेतृत्व, समाजाच्या सर्व स्तरातील लोकांचा असणारा मोठा पाठिंबा आणि वंचित, पिडित घटकांसाठी काम करण्याची त्यांची तळमळ याची प्रचिती महाराष्ट्राला वारंवार आलेली आहे येत आहे. स्वाभिमानी आणि कणखर बाणा यामुळे राजकारणात त्यांची एक वेगळी छाप आहे. निवडणूक म्हटलं की जय-पराजय असतो पण बीडच्या निवडणुकीत त्यांचा झालेला निसटता पराभव सर्व सामान्य कार्यकर्त्यांच्या मनाला इतका जिव्हारी लागला की, आत्महत्येसारख्या घटना घडल्या. हे असं एखाद्या राजकीय नेत्याच्या बाबतीत क्वचितच घडलं असेल. महाराष्ट्राच्या राजकारणात असं यापूर्वी कधी झाला नसावं. आपल्या लाडक्या नेत्याच्या पराभवानंतर कार्यकर्त्यांनी स्वतःच्या जीवाचं बरं-वाईट करणं ही तशी वेदनादायक आणि मनाला





चटका लावणारी गोष्ट..पण यातून एखाद्या नेत्यांवर सामान्य माणूस किती जीवापाड प्रेम करतो हे ही दिसून येतं, पंकजाताईंच्या बाबतीत देखील असंच झालं. केवढ हे प्रेम..! पंकजाताईंच्या मागे असणारी जनशक्ती किती प्रचंड आहे, हे सत्ता अथवा कोणतही संवैधानिक पद नसताना शिवशक्ती परिक्रमा असो की दसरा मेळावा यात वेळोवेळी दिसून आलेलं आहे. लोकसभेत झालेल्या पराभवानंतर पंकजाताईंना दुर्लक्षित करून चालणार नाही हे लक्षात आल्यानं भारतीय जनता पक्षानं त्यांना विधानपरिषदेवर संधी दिली आणि त्या आमदार म्हणून विजयी झाल्या. या विजयाने राज्यातील लाखो, करोडो कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा एकदा नवचैतन्य निर्माण झाले. कोण आली रे कोण आली, महाराष्ट्राची वाघीण आली या गर्जनेने महाराष्ट्राचं विधानभवन त्यादिवशी अक्षरशः दणाणून गेलं. लोकसभेतील पराभवानंतर पंकजाताई खचून गेल्या नाहीत, पुन्हा नव्या उमेदीने कामाला लागल्या. 'उतणार नाही, मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही' या ध्येयाने महाराष्ट्राची ही वाघीण पुन्हा मैदानात उतरली आहे असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

पंकजाताई मुंडे यांची राजकीय कारकीर्द सुरवातीपासून तशी संघर्षाचीच.. तरीही त्यावर स्वकर्तृत्वाने मात करत मिळालेल्या प्रत्येक संधीचा उपयोग त्यांनी लोकांच्या भल्यासाठीच केला. एक सरळमार्गी राजकारणी, जनतेच्या अडी- अडचणीला धावून जात त्यांच्या वेदना समजून घेण्याचं काम त्यांनी सातत्यानं केलं. महाराष्ट्रातील लाखो- करोडो कार्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी आपुलकी अन् प्रेमाची भावना आहे, हिच शक्ती त्यांना उर्जा देऊन जाते. पंकजाताई कधी कोणाचं वाईट चिंतणार नाहीत की करणार नाहीत, त्या त्रास सहन करणाऱ्या पैकी आहेत, देणाऱ्या पैकी मुळीच नाहीत, ही भावना, हा आदर आज त्यांच्याविषयी सामान्य कार्यकर्त्यांमध्ये आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी कोणाची हुजरेगिरी करणे, झुकणे त्यांच्या रक्तात नाही तथापि राजकारणात वरिष्ठांचा आदर ठेवण्याचे संस्कार त्या कधी विसरल्या नाहीत.

राजकारणात काम करत असताना जनतेच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये, याची काळजी त्या सतत घेत असतात. हीच काळजी त्यांच्यात सामान्य माणसांविषयी असलेली तळमळ दाखवून देते. सत्तेच्या काळात मंत्री म्हणून त्यांचे काम उल्लेखनीय असंच होतं, आपल्या खात्याच्या माध्यमातून विविध योजनांचा लाभ तर त्यांनी गोरगरिबांपर्यंत पोहोचविलाच परंतु त्याचबरोबर अनेक नव नवीन योजना अंमलात आणून लोक कल्याणाची एक अनोखी संकल्पना रूजविली. मध्यप्रदेशात सह प्रभारी म्हणून काम करीत असताना तिथल्या भाजप सरकारने राबविलेली 'लाडली बहना' योजना त्यांच्या आग्रहामुळे महाराष्ट्र सरकारने इथेही अंमलात आणली, हे त्यांच्यात असलेल्या लोकनेत्याचं उत्तम उदाहरण म्हणावं लागेल.

सत्तेच्या माध्यमातून विविध लोकोपयोगी उपक्रम राबवल्याने त्यांना अफाट लोकप्रियता मिळाली, ज्यामुळं अनेकांची पोटं दुखली, त्यांच्या विरोधात कट कारस्थानही रचली गेली पण, प्रत्येक 'विजयात संघर्ष' आणि प्रत्येक 'संघर्षात विजय' या लोकनेत्याच्या समीकरणाची शिकवण व संस्काराच्या शिदोरीवर त्यांनी इथेही विजय मिळवला. वंचित, शोषित, बहुजनांच्या हितासाठी मुंडे साहेबांचा वसा घेऊन सुरु झालेला त्यांचा राजकीय प्रवास रोखण्याचा निष्फळ प्रयत्न अनेकांनी केला, परंतु संघर्षाची शिकवण व जनसामान्यांचे असीम पाठबळ लाभल्याने त्यांना रोखणं कुणालाही शक्य झालं नाही.

मोठया माणसांचा वारसा चालवणं हे तसं एक आव्हानच असतं, ते पेलणं सर्वानाच शक्य ◀◀ पान ३ वर

# जिल्ह्यात बालविवाह झाल्यास पोलिसांनी गुन्हा नोंदवून चार्जशीट दाखल करावी

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात बालविवाह झाल्यास पोलिसांनी गुन्हा नोंदवून चार्जशीट दाखल करावी, असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी बुधवारी बाल विवाह निर्मूलन विषयी झालेल्या आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी श्री पाठक यांच्या अध्यक्षतेत बालविवाह निर्मूलन या विषयावर आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकान, ज्ञानेश्वर मोकाटे, जिल्हा महिला व बालकल्याण



## जिल्हाधिकाऱ्यांचे पोलिसांना स्पष्ट निर्देश

अधिकारी सुधीर ढाकणे, यांच्यासह अध्यक्ष बाल समिती, जिल्हा समन्वय चाइल्ड लाईन युनिसेफ sb3 च्या प्रतिनिधी सोनिया हांगे उपस्थित होत्या.

बुधवारी झालेल्या बैठकीत ०१ एप्रिलपासून १४९ बालविवाह थांबविण्यात आले, असून दोन गुन्हे दाखल करण्यात आले मात्र अद्याप त्यावर चार्जशीट न झाल्यामुळे बालविवाह होतच आहेत. बालविवाह करणे हे कायद्याने गुन्हा असून देखील जिल्ह्यामध्ये त्याची वारंवारता बघायला मिळते. बालविवाह मुळे मुलीच्या शैक्षणिक, शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास थांबून जातो हे वारंवार सांगुनही समाज जागृती करूनही पालकांकडून तसेच नातेवाईकांकडून येणाऱ्या दबावामुळे बालविवाह घडत असतात.

१०९८ चाइल्ड हेल्प लाईन वरून माहिती मिळाल्यास होणारे बालविवाह थांबविले दिले जात आहे. मात्र ते पुरेसे नसून पोलिसांद्वारे कडक कारवाई होत नसल्यामुळे बालविवाह होत असतात. हे थांबविण्यासाठी पोलिसांनी गुन्हा नोंदवून चार्जशीट दाखल करावे असे स्पष्ट निर्देश जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत दिले.

# ओबीसी आरक्षण वाचविण्यास पाठिशी उभे राहणाऱ्यांना अठरापगड ओबीसी बांधवांनी निवडून द्यावे - प्रा. हाके

## प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या ओबीसी जनअक्रोश रॅलीचे पंचक्रोशीत जल्लोषात स्वागत

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

यापुढे अठरापगड जातीतील ओबीसी बांधवांनी एकीने राहुन आपापल्या मतदारसंघात ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी पाठिशी खंबीरपणे उभे राहणाऱ्यांनाच अठरापगड जातीतील ओबीसी समाज बांधवांनी ओबीसी आमदार निवडून द्यावा. त्याचबरोबर आपले स्थानिक आमदार ओबीसी आरक्षणावर का बोलत नाहीत, असा जाब सकल ओबीसी समाजाने त्यांना विचारला पाहिजे. असे मत ओबीसी योध्दे प्रा. लक्ष्मण हाके यांनी बोलताना मांडले. ओबीसी आरक्षण बचाव जनअक्रोश रॅलीत ते बोलत होते.

ओबिसी आरक्षण बचाव आंदोलनाचे ओबीसी योध्दे प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांनी मागिल दोन दिवसांपासून जिल्हा दौऱ्यावर चालू केलेली जन आक्रोश रॅली



काल दि.२५ गुरूवारी नित्रुड येथील संत सेवालाल चौक व बसस्टँड तसेच तेलगाव येथील चौफाळ्यावर आली असता, त्यांचे माजलगाव व धारूर तालुक्यातील सकल ओबीसी बांधवांनी जंगी स्वागत केले. यावेळी पंच्याऐंशी वयाचे वयोवृद्ध श्रीरंग बडे यांच्या हस्ते प्रा. हाके व वाघमारे यांचा सत्कार करण्यात आला. समाजाशी संवाद साधताना हाके यांनी सांगितले की, ओबीसी समाजातील प्रत्येक घटकाने एकजुटीने राहुन यापुढे आपलाच ओबीसी समाजाचा आमदार झाला पाहिजे असा पण करावा. ओबीसी आरक्षण वाचविण्यासाठी तुमच्या पाठिंब्यामुळे मी लढा देण्यास समर्थ असल्याचेही ते म्हणाले. यावेळी ओबीसींच्या समर्थनार्थ घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.

आयोजित ओबीसी जनआक्रोश रॅलीचे दिंद्रुड, तेलगाव, नित्रुड परिसरात आगमन होताच सकल ओबीसी समाजाच्या वतीने ठिकठिकाणी स्वागत करत संवाद सभेचे आयोजन करण्यात आले. यावेळी ओबीसी चे माधव निर्मळ, नगरसेवक सतिश बडे,संजय आंधळे, माउली राठोड, कांताराव गायकवाड, ◀◀ पान ३ वर

# जालन्यात विना नंबरच्या ४० रिक्षावर कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरातील ऑटो रिक्षा विना नंबर व विना कागदपत्र व लायसन नसलेले ४० रिक्षावर पोलिसांनी कारवाई केली आहे यापुढे अशीच कारवाई करण्यात येईल तसेच सर्व सर्व ऑटो रिक्षा /अॅपे रिक्षा वाहन धारकांनी आपल्या मालकीच्या अॅटो रिक्षा / अँपे रिक्षा या वाहनावर नोंदणीकृत नंबर टाकुन वाहनाची सर्व कागदपत्रे अद्यावत करुन घेऊन परमीट, लायसंन्स, आर.सी.बुक सोबत बाळगणे तसेच वाहण चालवितांना गणवेश परिधान करणे बंधनकारक आहे. तसेच सर्व वाहन चालकांनी वाहतुक नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.



शहर वाहतुक शाखा जालना कडुन सर्व वाहनांचे कागदपत्रांची तपासणी करण्याची मोहीम वेळोवेळी राबविण्यात येत असुन वारंवार वाहतुक नियमांचे पालन न करणारे कसुरदार वाहण धारक यांचे वाहने जप्त करुन ठेवण्यात येणार आहे. नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनांवर कडक कायदेशिर कार्यवाही करण्यात येणार आहे. तरी सर्व वाहन धारकांनी आपल्या वाहनांचे कागदपत्र अद्यावत करुन वाहनांचे नंबर व्यवस्थीत लिहुन घेण्याचे तसेच आपले वाहणावर प्रलंवीत असलेला दंड वाहतुक शाखा येथे अथवा दिनांक २७.०७.२४ रोजीला राष्ट्रीय लोकअदालत येथे तात्काळ भरुन घेणेबाबत आवाहन पोलीस निरीक्षक शहर वाहतुक शाखा जालना यांच्याकडुन करण्यात ◀◀ पान ३ वर

# मतदारसंघाच्या विकासासाठी कटिबध्द -आ.प्रकाश सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव मतदारसंघाच्या विकासाकरीता रस्ते विकास योजना, घाट विकास योजना, आरोग्य विभाग, औद्योगिक वसाहत, साठ खाटांचे रूग्णालय, उप जिल्हारूग्णालय यासह विवीध कामांना मंजुरीसह निधीची उपलब्धता झाली असल्याची माहिती आमदार प्रकाश सोळंके यांनी पत्रकारांशी बोलतांना दिली आहे.



आमदार सोळंके म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातुन आठशे कुटूंबीयांना घरकुल योजनेचा लाभ दिला तर रमाई आवास योजनेच्या माध्यमातुन २०३ कुटूंबीयांना घरकुल योजनेचा लाभ दिला आहे. पालिकेच्याप्रशासकीय इमारतीचे काम पुर्ण केले आहे. १२५ कोटी रूपये खर्चाचे ४३५ सिमेंट रस्ते विवीध रस्ते योजनेतुन करण्यात आले आहेत तर राजमाता जिजाउ घाट विकास योजनेअंतर्गत सिंदफणा घाट विकासाकरीता विस कोटी रूपये, नाट्यगृह विकासाकरीता पाच कोटी रूपये, बुध्दविहाराची उभारणी ◀◀ पान ३ वर

# धारूर तालुक्यात अतिवृष्टी, कापूस सोयाबीन पाण्यात महसूल प्रशासनाने तातडीने पंचनामे करण्याची शेतकऱ्यांची मागणी

किल्ले धारूर । प्रतिनिधी

धारूर तालुक्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली या अतिवृष्टीमध्ये तालुक्यातील अंजनडोह महसूल मंडळामध्ये शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे कापूस सोयाबीन इत्यादी पिके पाण्याखाली गेली आहेत त्यामुळे बळीराजा संकटात सापडला आहे.

धारूर तालुक्यातील अंजनडोह, रुई धारूर, असरडोह, रेपेवाडी या अंजनडो महसूल मंडळात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी झाली लहान मोठ्या नद्या ओढे ओसंडून वाहिली आहेत शेतीमध्ये तळ्या सारखे पाणी जमा झाले आहे यावर्षी जून महिन्यातच पेरण्यात झाल्यामुळे शेतकरी




आनंदात होते पीकही चांगली आली होती मागील काही दिवसापासून सतत धारूर तालुक्यामध्ये कमी जास्त प्रमाणात पाऊस सुरू होता त्यामुळे शेतामध्ये पाणी जमा होण्यास सुरुवात झाली होती त्यातच आज झालेल्या अतिवृष्टीमुळे कापूस सोयाबीन या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे असं असोला गोपाळपूर महसूल मंडळामध्ये ही अतिवृष्टी झाली आहे या भागातील शेतकऱ्यांचे अतिवृष्टीमुळे

# पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र यांची गोंदी पोलीस ठाण्याला भेट




अंबड । प्रतिनिधी

अबंड तालुक्यातील गोंदी पोलीस ठाण्याला औरंगाबाद परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, यांनी मंगळवारी सकाळी अचानक भेट दिली, यावेळी त्यांनी पोलीस ठाण्याची माहिती, गावे, पोलीस कर्मचाऱ्यांचे विचारपूस केली, यावेळी अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नेपाणी, आंबड उपभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे, गोंदी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर, शहागड पोलिस चौकीचे उपनिरीक्षक इब्राहिम शेख, उपनिरीक्षक गणेश जागडे, उपनिरीक्षक किरण हावाले, यांच्यासह पोलीस जमादार पोलीस कर्मचारी यांची उपस्थिती होती. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक यांना मानवंदना देण्यात आली.

छ.संभाजीनगरचे परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक रविंद्र मिश्र यांच्या सोबत अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नेपाणी, उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल खांबे,गोंदी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष खांडेकर आदी.

# शेतमजूर युनियनची तहसीलवर निदर्शने

**परळी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन (लाल बावटा) परळी तालुका कमिटीच्या वतीने विविध मागण्यांसाठी गुरुवार दि २५ रोजी तहसील कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली.यावेळी तालुक्यातील अनेक गावातुन मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र आले होते.

भूमिहीन शेतमजूर, वृद्ध , निराधार व ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजुरांसाठी कल्याणकारी महामंडळ सुरू करा. राज्य सरकारने या महामंडळासाठी निधीची तरतूद करावी.भूमिहीन शेतमजूर व ग्रामीण गरिबांना सामाजिक सुरक्षा देणारा सर्वंकष केंद्रीय कायदा करावा.केरळ राज्याच्या धर्तीवर बेघरांना घरकुलासाठी सात लाख रुपये



अनुदान द्यावे.विधवा व निराधार महिलांचे कुटुंबातील मुला मुलींना शिक्षणासाठी व लग्नासाठी अर्थसहाय्य करण्यात यावे.ग्रामीण भागातील ज्या कुटुंबाकडे राशन कार्ड नाही त्यांना राशन कार्ड वाटप करून स्वस्तात धान्य वाटप करावे या मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन (लाल बावटा) परळी तालुका कमितीकडून तहसील कार्यालयासमोर निदर्शने आंदोलन करण्यात आली.या प्रसंगी युनियनचे सय्यद रज्जाक,कॉ. सुदाम शिंदे,कॉ. सखाराम शिंदे,कॉ विष्णू पोटभरे, कॉ रेखा शिंदे, कॉ संगीता रुमाले, कॉ प्रकाश उजगरे, कॉ चंद्रकला शिंदे आदींसह अनेक जण उपस्थित होते.

# मराठवाड्यात शेकाप मजबूत करा-भाई प्रा.बाबुराव लगारे

## पंढरपूर येथे २ व ३ ऑगस्टला शेतकरी कामगार पक्षाचं राज्य अधिवेशन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शेतकरी कामगार पक्षाची मराठवाडा विभागाची बैठक दि.२२ जुलै२०२४ रोजी अंबाजोगाई येथे संपन्न झाली.शेकापचे दि.२ व ३ ऑगस्ट रोजी पंढरपूर येथे राज्यस्तरीय अधिवेशन होणार आहे.त्या अधिवेशनाच्या तयारीसाठी व मराठवाडा विभागात बांधनीसाठी प्रामुख्याने चर्चा करण्यात आली.

बैठकीत मार्गदर्शन करताना भाई प्रा.बाबुराव लगारे म्हणाले शेतकरी कामगार पक्ष हा तळागाळातील सर्वसामान्यासाठी अहोरात्र संघर्ष करणारा पुरोगामी




विचारांचा पक्ष आहे. या पक्षाला शेतकरी,कामगार चळवळीचा क्रांतिकारी इतिहास आहे.मराठवाड्यात शेतकरी कामगार पक्षाचा प्रत्येक गावात घराघरात कार्यकर्ता आहे.त्यांना संघटित करुन पुन्हा मराठवाड्यात पक्ष बांधनी करावी असे आव्हान केले.यावेळी भाई बाबासाहेब देवकर, भाई डिगाबर कांबळे,भाई उमाकांत राठोड,प्रा. राजेश ढवळे,प्रा.चंद्रकांत चव्हाण,काका शिंदे यांनी ही बैठकीत मार्गदर्शन केले.प्रास्ताविक करताना शेकापचे युवा नेते भाई मोहन गुंड म्हणाले की ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# पुण्यात आर्मी... पावसाचा हाहाकार, पूर पीडितांच्या मदतीसाठी ८५ जणांची टीम तैनात





पुणे : पुण्यात मुसळधार पाऊस सुरु आहे. पुण्यातील अनेक भागांमध्ये पावसाने हाहा:कार माजवला आहे. मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. पुण्यातील परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊन पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी प्रशासनाकडून कशाप्रकारे बचावकार्य सुरु आहे, याचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच आता नागरिकांच्या बचावासाठी आणि त्यांना सुरक्षितस्थळी हलवण्यासाठी भारतीय लष्कराची तुकडी तैनात करण्यात आली आहे.

पुण्यात मुसळधार पावसामुळे अनेक रस्त्यांना नद्यांचं स्वरुप आलं आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरलं आहे. तर काही भागात जनजीवन देखील विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी प्रशासन कामाला लागलं आहे. पुण्याच्या नागरी प्रशासनाने केलेल्या विनंतीवरुन लष्कराच्या बचाव आणि मदत कार्य पथकाने एकता नगरच्या दिशेने प्रयाण केले आहे. या पथकामध्ये लष्कराचे जवान, अभियांत्रिकी कृती दल तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांचा समावेश असून या पथकासोबत आपत्तीने प्रभावित लोकांना मदत करण्यासाठी तसेच तत्पर आणि परिणामकारक मदतकार्यासाठी आवश्यक बचाव बोटी आणि अत्यावश्यक वैद्यकीय सेवा देण्यासाठी टीम सज्ज करण्यात आली आहे. तसेच लष्कराच्या अतिरिक्त पथकांना सज्ज ठेवण्यात आले असून वेळ आलीच तर अगदी कमी वेळात ही पथके आवश्यकता असेल तेथे त्वरित पोहोचू शकतील. भारतीय लष्कराच्या दक्षिण कमांडमधील अधिकारी नागरी प्रशासन तसेच इतर सरकारी संस्थांशी समन्वय साधत, परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. स्थानिक प्रशासनाकडून लष्कराच्या मदतीसाठी विनंती करण्यात आली. या विनंतीला प्रतिसाद देत लष्कराच्या कृती दलाला प्रभावित भागाकडे तातडीने पाठवण्यात आले. एकूण ८५ जणांचा समावेश असलेल्या या पथकामध्ये लष्कराचे जवान, अभियांत्रिकी रेजिमेंट आणि लष्करी रुग्णालये तसेच इतर तज्ञ घटकांतील वैद्यकीय पथके सहभागी आहेत.

भारतीय सशस्त्र दले तयारीत

लष्कराचे जवान बचाव आणि मदत कार्यात संपूर्णपणे सहभागी झाले आहेत. गरज लागली तर मदतीसाठी भारतीय हवाई दलाला देखील सज्ज राहण्यास सांगितले आहे. या आपत्तीत नागरी प्रशासनाला मदत करण्यासाठी भारतीय सशस्त्र दले तयारीत आणि सुसज्ज आहेत.



## धनकवडी-सहकारनगर परिसरातील रस्त्यावर पाणी; झाडेही पडल्याच्या घटना

**पुणे । प्रतिनिधी**

पहाटेपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसामुळे धनकवडी-सहकारनगर परिसरातील रस्त्यावर गुडघाभर पाणी, चिखल आणि झाडे पडल्याच्या किरकोळ घटना घटल्या. यामुळे नागरिकांना घराबाहेर पडता आले नाही.

सलग पाऊस पडत असल्यामुळे बालाजीनगर, भारती विद्यापीठ, मोहननगर, मामा येनपुरेनगर, संभाजीनगर, तळजाई पठार आदी रस्त्यावर पाण्याचे तळे झाले आहे. तसेच धनकवडीतील बऱ्याच पार्किंग मध्ये पाणी साठत असल्याने काही सोसायटीतील नागरिकांनी नाल्यांची झाकण उघडून पाणी जाण्यास ड्रेनेज उघडे केले होते.

धनकवडीतील अतंर्गत रस्त्याचे काम सुरु असून, चंद्रभागा चौक, शिव कृष्ण मित्र मंडळ चौक समोरील मुख्य रस्ते खोदल्याने आणि ड्रेनेज ओव्हर फ्लो झाल्याने पाणी साचले होते. तर काही ठिकाणी पावसाच्या पाण्याच्या प्रवाहाने रस्त्यावरील डांबर निघून गेल्याने खड्डे पडले. काल रात्री पासूनच मुसळधार पाऊस पडत असल्याने काही ठिकाणी अंतर्गत चेंबर मधून पाणी रस्त्यावर आले. भारती विद्यापीठ परिसर त्रिमूर्ती चौक, दत्तनगर चौकाकडे जाणारा राजमाता भुयारी मार्गात देखील मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने वाहतूक कोंडी पाहायला मिळाली. यामुळे धनकवडी परिसरात त्रिमूर्ती चौकाकडे जाणाऱ्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती.

## सतर्कतेचा इशारा ! खडकवासला धरण परिसरात १०० मिमी. पावसाची नोंद



**पुणे। प्रतिनिधी**

खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये सुरू असणारा सायकाळी ४ ते ६:०० वा. ३५५७४ क्यूसेक करण्यात आलेलूआहे. तसेच धरण परिसरात १०० मिमी. व घाटमाथ्यावर ३०० मिमी. पेक्षा जास्त सरासरी पावसाची नोंद झालेली आहे.

तसेच पावसाच्या प्रमाणानुसार विसर्ग पुन्हा कमी/जास्त करण्याची शक्यता असण्याची माहिती कार्यकारी अभियंता खडकवासला पाटबंधारे विभाग पुणे यांच्याकडून देण्यात आलेली आहे. शहरातील पुढील ठिकाणी त्वरित दक्षता घेण्यात यावी तसेच संबंधित ठिकाणी जाण्यास प्रतिबंध करण्यात यावा असे निर्देश देण्यात आलेले आहेत. मध्य भारतात पुढील २ दिवसांत मुसळधार पाऊस कायम राहण्याची शक्यता आहे आणि त्यानंतरच्या ३ दिवसांत पावसाचा जोर कायम राहणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. पुढील २ दिवसांत गुजरातसह कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात अतिवृष्टीची शक्यता आहे. त्यानंतरही या भागांत पावसाचा जोर कायम राहणार असल्याचे हवामान विभागाने बुधवारी सांगितले

## सततधार पावसामुळे बिबट मादी पासून दुरावला; नवजात बछडा आईच्या विरहाने व्याकुळ

**नारायणगाव । प्रतिनिधी**

सततधार पावसामुळे बिबट मादी पासून नवजात बछडा दुरावला आहे. आईच्या विरहाने व्याकुळ झालेला बछडा पिंपळगाव तर्फे नारायणगाव येथील शेतकरी महेश खांडगे यांच्या घराजवळ आला. खांडगे यांनी बछड्याला वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांच्या ताब्यात दिले. बछडा दहा ते वीस दिवसांचा असून मादी जातीचा आहे.



अन्न न मिळाल्यामुळे तो अशक्त झाला होता. माणिकडोह येथील बिबट निवारा केंद्रात बछड्याला दूध पाजल्यानंतर तो तरतरीत झाला असून त्याच्या मूळ स्वभावानुसार आता तो गुरगुरायला लागला आहे. बछड्याला पुन्हा मादीच्या ताब्यात देण्यासाठी आज रात्री प्रयत्न करण्यात येणार आहेत. अशी माहिती वनरक्षक ज्ञानेश्वर पवार यांनी दिली.

पिंपळगाव तर्फे नारायणगाव (ता. जुन्नर) येथील वाणीमळा शिवरात महेश खांडगे कुलस्वामी रोपवाटिका आहे. मंगळवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास पाऊस सुरू असताना बछडा घराजवळ दिसून आला. पावसामुळे बछडा गारठला होता.

खांडगे यांनी याबाबतची माहिती जुन्नर वनविभागाचे वनरक्षक ज्ञानेश्वर पवार, पोलीस पाटील सुशांत भुजबळ यांना दिली. पवार व भुजबळ आणि तातडीने घटनास्थळी जाऊन बछड्याला ताब्यात घेतले. अन्न न मिळाल्यामुळे व पावसाने भिजल्यामुळे बछडा अशक्त झाला होता. बछड्याला उपचारासाठी तातडीने माणिकडोह येथील निवारा केंद्रात दाखल करण्यात आले. डॉ. महेंद्र ढोरे यांनी बछड्यावर प्राथमिक उपचार करून त्याला अन्न पाणी दिल्यानंतर बछडा तरतरीत झाला असून तो आता गुरगुर करत आहे. घटनास्थळी बिबट्याच्या पायांचे ठसे आढळून आले आहेत. उपवनसंरक्षक अमोल सातपुते, वनपरिक्षेत्राधिकारी प्रदीप चव्हाण, माणिकडोह बिबट निवारा केंद्राचे पशुवैदय डॉ. महेंद्र ढोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आज रात्री ट्रॅप कॅमेरा लावून बछड्याला मादीच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. ट्रॅप कॅमेरामुळे मादी बछड्याजवळ येताच मोबाईलद्वारे दिसणार आहे

## हुल्लडबाजी करणाऱ्या ४८ पर्यटकांवर कारवाई

**लोणावळा । प्रतिनिधी**

शहरातील भुशी धरण मार्गावर असलेल्या सहारा पुलाच्या पुढे असणार्या तीन धबधब्यांच्या वरील बाजूस डोंगरकड्यावर तसेच लायन्स पॉईंट, टायगर पॉईंट, घुबड तलाव, भुशी धरण परिसरात हुल्लडबाजी करणार्या ४८ पर्यटकांवर वन विभाग आणि लोणावळा पोलिसांनी कारवाई केली आहे.

भुशी धरणावर झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर तीन आठवड्यांपूर्वी पुणे जिल्हाधिकारी यांनी धोकादायक पर्यटनस्थळांवर जाण्यास बंदी घातलेली आहे. यातच सहारा पुलाच्या समोरच्या बाजूला असलेल्या तीन छोट्या धबधब्याच्या वरच्या बाजूला जाण्यासाठी पूर्णवेळ तसेच इतर काही पर्यटनस्थळांवर ठिकाणी जाण्यास सायंकाळी ६ नंतर पूर्णपणे प्रतिबंध घालण्यात आला आहे.

पोलिस, वनविभागाने फलक लावून, लाऊडस्पीकरवरून तशा सूचना पर्यटकांना देत असतात. मात्र, तरीही या सूचनांकडे कानाडोळा करून अनेक अतिउत्साही पर्यटक धाडस करायला जातात. त्यामुळे आता अशा पर्यटकांवर थेट कारवाई करण्याचे पाऊल पोलिस प्रशासन आणि वनखात्याने उचलले असून, गेल्या १५ दिवसांत ४८ जणांवर कारवाई करण्यात आली आहे.

## लवासा सिटीत दरड कोसळली, दोन ते तीन जण अडकल्याचा अंदाज

**मुळशी । प्रतिनिधी**

मुळशी तालुक्यात सर्वत्र मुसळधार पाऊस पडत असल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मोसे खोऱ्यामध्ये गेल्या तीन दिवसापासून मुसळधार पाऊस पडत आहे. या मुसळधार पावसामुळे दासवे लवासा सीटी इथे दरड कोसळून दोन ते तीन बंगले मातीखाली गाडले गेले आहेत. तसेच या परिसरामध्ये अनेक ठिकाणी वाहतूक बंद होऊन रस्ते खचले आहेत. या परिसरात पावसामुळे प्रचंड मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

लवासा सिटी या ठिकाणी प्रचंड प्रमाणात पाऊस सुरू आहे. या पावसामुळे येथील दोन ते तीन बंगल्यांवर दरड कोसळून संपूर्ण बंगले मातीखाली गाडले गेले आहे, तर काही बंगल्यांचा भाग रस्त्यावर येऊन वाहतूक बंद झाली आहे. येथील एका बंगल्यामध्ये लाईटचे काम करण्यासाठी दोन माणसे निवासाला होती, अशी माहिती ग्रामस्थांकडून मिळत आहे. त्या कामगारांचा अद्याप शोध लागला नाही. त्यामुळे ते दोन्ही कामगार



बंगल्यातून बाहेर पडले की बंगल्यात अडकून पडलेत हे समजू शकले नाही. त्यामुळे सध्या तरी हे दोन्ही कामगार बेपत्ता असल्याची माहिती नागरिक देत आहे.

लवासा सीटी ते वरसगाव या रस्त्यावरील अनेक ठिकाणी मोठमोठ्या भेगा पडल्या असून संपूर्ण रस्ता चिखलमय झाला आहे. संपूर्ण मौसे खोऱ्यामध्ये पावसामुळे अनेक ठिकाणी विजेचे विद्युत काम कोसळून विज पुरवठा खंडित झाला आहे. त्यामुळे मोसे व लवासा सिटी परिसरात संपूर्ण जीवन विस्कळीत झाले आहे. संपूर्ण परिसरात खूप मोठ्या प्रमाणात पाऊस पडत असल्यामुळे नागरिकांनी काळजी घ्यावी, कोणीही घराबाहेर पडू नये असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## पुण्यात तिघांचा विजेचा शॉक लागून मृत्यू

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात जोरदार पाऊस सुरु आहे. दरम्यान भिडे ब्रिज परिसरातील झेड ब्रिज खालील अंडा भुर्जी स्टॉल सुरक्षित ठिकाणी हलवण्यात गेलेल्या तिघांचा विजेचा शॉक लागल्याने मृत्यू झाला. अभिषेक घाणेकर, आकाश माने आणि शिवा परिहार अशी मृतांची नावे आहेत.

पुण्यात जोरदार पाऊस सुरु असून जिल्ह्याला हवामान खात्याने आज रेड अलर्ट जाहीर केला आहे. शहरात बऱ्याच ठिकाणी पाणीच-पाणी झाले आहे. दि.२५ पहाटे तीन वाजताच्या सुमारास भिडे ब्रिज परिसरातील झेड ब्रिज खाली पाणी पातळी वाढली. पाणी पातळी वाढल्याने तेथील अंडा भुर्जी स्टॉल सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी तिघेजण गेले. सुरक्षित ठिकाणी हलवताना अचानक विजेचा शॉक लागून तिघांचा मृत्यू झाला. या तिघांपैकी अभिषेक अजय घाणेकर (वय वर्ष २५) आणि आकाश विनायक माने (वय वर्ष २१) दोघे पुलाच्या वाडी डेक्कन येथिल रहिवासी असुन शिवा जिदबहादुर परिहार (वय १८) नेपाळी कामगार आहे. शॉक लागल्यानंतर तिघांना नजीकच्या हॉस्पिटल येथे दाखल केले. उपचारांती डॉक्टरांनी मयत घोषित केले.

## पुणे आणि पिंपरीतील शाळांना सुट्टी जाहीर

**पिंपरी । प्रतिनिधी**

मागील दोन दिवस झालेल्या मुसळधार पावसामुळे सार्वजनिक वाहतूक सेवा, विमान सेवा आणि रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली आहे. दरम्यान सखल भागात पाणी साचले आहे. याची दखल घेत जिल्हा प्रशासनाने शुक्रवारी (दि.२६) शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर केली आहे.

भारतीय हवामान विभागाने शुक्रवारी पुण्यामध्ये पावसाचा रेड अलर्ट जारी केला. यानंतर जिल्हाप्रशासनाने शहरातील शाळांनी पालकांना कळवावे आणि आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासन केले आहे. ही बाब लक्षात घेऊन सर्व शाळा आणि महाविद्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. या संदर्भात शाळा आणि शिक्षकांनी पालकांच्या प्रतिनिधींना कळवावे, असे आवाहन जिल्हाप्रशासनाने केले आहे.



हवामान विभागाने येत्या काही तासात पुणे शहर आणि घाट क्षेत्रात मुसळधार पावसाचा इशारा दिला असल्याने भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला परिसर, खेड, आंबेगाव, जुन्नर घाट माध्यावरील शाळा आणि पुणे व पिंपरी चिंचवड शहरातील शाळा शुक्रवारी (दि.२६) बंद ठेवण्यात आलेल्या आहेत. खडकवासला धरणातून ४० हजार क्यूसेक विसर्ग सुरू आहे. त्यामुळे पुणे शहराच्या सखल भागात पाणी साचण्याची शक्यता आहे. याकरिता नागरिकांनी दक्षता बाळगावी. सुट्टीच्या कालावधीत सर्व मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यालयीन वेळेत शाळेत उपस्थित राहून स्थानिक प्रशासनाच्या आदेशानुसार आपत्ती व्यवस्थापनाचे कामकाज करावे अशा ही सूचना प्रशासनाने केलेल्या आहेत.

## पुण्याला ३२ वर्षात पहिल्यांदा पावसाने एवढं धु- धु धुतलं, हवामान तज्ज्ञांची माहिती

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यात मुसळधार पावसामुळे अनेक रस्त्यांना नद्यांचं स्वरुप आलं आहे. अनेकांच्या घरात पाणी शिरलं आहे. तर काही भागात जनजीवन देखील विस्कळीत झाल्याचं पाहायला मिळत आहे. लोकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यासाठी प्रशासन कामाला लागलं आहे. हवामान विभागाने आज पुणे शहराला रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. आज मुसळदार पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या इशाऱ्यानुसार येत्या काही तासांमध्ये पुणे शहर, भोर, वेल्हा, मावळ, मुळशी, हवेली तालुक्यातील खडकवासला, पिंपरी चिंचवड परिसरात अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर गेल्या ३२ वर्षांमध्ये पहिल्यांदाच इतका पाऊस झाला असल्याची माहिती हवामान तज्ज्ञ अनुपम कश्यपी यांनी दिली आहे.



हवामान तज्ज्ञ अनुपम कश्यपी माहिती देताना म्हणाले, गेल्या ३२ वर्षांमध्ये पहिल्यांदाच पुण्यात आत्तापर्यंत रेकॉर्ड ब्रेक पाऊस झाला आहे. गेल्या २४ तासांमध्ये झालेला मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस (झींपश क्शरीं ठरळप) पुण्यात झाला आहे. पुण्याच्या (झींपश ठरळप) काही भागांमध्ये अतिवृष्टी सदृश्य पाऊस कोसळला आहे. शहर परिसरातील सर्व धरणे जवळपास भरली आहेत. पावसाचा वाहतुकीवर मोठ्या प्रमाणावर परिणाम झाला असल्याचे दिसून येत आहे. रस्त्यांवर मोठ्या प्रमाणावर पाणी झाल्याचं दिसून येत आहे. चालकांनी व्यवस्थित वाहने चालवा, आवश्क नसल्यास घराबाहेर जाणे टाळा, काळजी घ्या असंही त्यांनी म्हटलं आहे.

पुण्यात मुसळधार पावसानं थैमान घातलं असून जनजीवन विस्कळीत झालं आहे.अनेक भागात रस्ते जलमय झाले आहेत. शहराच्या सखल भागात पाणी साचून ठिकाणी घरांमध्ये पाणी शिरलं आहे. एनडीआरएफकडून मदत आणि बचावकार्य सुरु आहे. प्रशासनाच्या वतीने नागरिकांना सर्तकतेचे आवाहन करण्यात आले आहे. गरज नसल्यास घराबाहेर पडू नका असंही प्रशासनाकडून सांगण्यात आलं आहे.

पुणे महानगर पालिका हद्दीत एकता नगरी सिंहगड रोड वरील द्वारका सोसायटी, शरदा सरोवर सोसायटी, शाम सुंदर सोसायटी, निंबजनगर परिसरातील सोसायटी, सिंहगड रोड, घरकुल सोसायटी पिंपरी चिंचवड, वृंदावन आश्रम आकुर्डी विशालनगर, जगताप डेअरी विणस सोसायटी, कुंदननगर या गृह निर्माण हाउसिंग सोसायटी मध्ये पावसाचे पाणी शिरले.

कोणते पूल बंद?

पुणे महानगर पालिका हद्दीत बालेवाडी पूल, मुळा नदी पूल, संगम रोड पूल, होळकर पूल, संगमवाडी पूल, महर्षी शिंदे पूल, हडपसर- मुंढवा रोड पूल, मातंग पूल, येरवडा शांतीनगर येथील पूल, निंबजनगर पूल, मोई, व चिकली रस्त्यावरील इंद्रायणी पुल पावसामुळे पाण्याखाली गेले आहेत.

## तळेगाव तिहेरी हत्याकांड : अखेर 'त्या' मायलेकरांचा शोध थांबला..!

**पुणे । प्रतिनिधी**

नराधम प्रियकराने प्रेयसीच्या मृतदेहासह तिच्या दोन चिमुरड्या मुलांना नदीमध्ये फेकून दिले. ही धक्कादायक घटना सोमवारी (दि. २२) तळेगाव दाभाडे येथे उघडकीस आली. दरम्यान, एनडीआरएफ आणि वन्यजीव रक्षकांच्या एकूण पाच टीमने सलग तीन दिवस माय लेकरांचा शोध घेतला. मात्र, अतिवृष्टीमुळे पाण्याची पातळी वाढल्याने शोधकार्य थांबवण्यात आले आहे.

समरीन निसार नेवरेकर (वय २५) आणि ईशांत (वय ५ वर्ष), इजान (वय २ वर्ष), अशी शोध शोध सुरू असलेल्या माय लेकरांची नावे आहेत. याप्रकरणी आरोपी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर (३७, रा. समता कॉलनी, वराळे, मावळ), रविकांत भानुदास गायकवाड (४१, रा. डॉन बॉस्को कॉलनी, ईश्वरानंद सोसायटी, सावेडी, अहमदनगर) यांना पोलिसांनी अटक केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी गजेंद्र दगडखैर याने ६ जुलै समरीन नेवरेकर हिला गर्भपात करण्यासाठी मित्र रविकांत गायकवाड याच्यासोबत कळंबोली येथे पाठविले. दरम्यान, रुग्णालयात गर्भपात सुरू असताना समरीन हिचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपींनी आपसात संगनमत करून ९ जुलै रोजी समरीनचा मृतदेह आणि तिच्या दोन्ही लहान मुलांना तळेगाव येथील वराळे येथे आणले. इंद्रायणी नदीत फेकून मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्लॅन त्यांचा ठरला. त्यानुसार, इंद्रायणी नदीत आरोपींनी समरीनचा मृतदेह फेकला. आईला फेकल्याचे पाहून दोन्ही मुले मोठमोठ्याने रडू लागली. त्यामुळे नराधम आरोपींनी दोन्ही मुलांना देखील जिवंतपणे नदीत फेकून दिले. या प्रकरणी गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.या घटनेचे तीव्र पडसाद उमटले. मावळ परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मृत समरीन नेवरेकर हिच्या नातेवाईकांनी आरोपींना फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी केली आहे. काही सामाजिक संस्थांनी पोलिस ठाण्यात धाव घेत समरीनच्या आई वडिलांना शासनाने मदत करावी, अशी मागणी केली.दरम्यान, समरीन हिच्या मृतदेहासह दोन चिमूरड्या मुलांना शोधण्यासाठी एनडीआरएफ आणि वन्यजीव रक्षकांच्या पाच टीम नदीमध्ये उतरल्या होत्या. सलग तीन दिवस शोधकार्य करूनही टीमला यश मिळाले नाही. बुधवारी (दि. २४) रात्रीपासून पावसाने जोर धरल्याने नदीच्या पाण्याची पातळी वाढली. त्यामुळे टीमला माय लेकरांचा शोध घेणे कठीण झाले. तसेच, एनडीआरएफच्या जवानांना माघारी बोलवल्याने शोधकार्य थांबवण्यात आले आहे.

cmyk